रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १५४ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## मुंबईत काँग्रेसचे आंदोलन

मुंबई : काही दिवसांपूर्वी सातारा फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करणाऱ्या एका महिला डॉक्टरने हॉटेलमध्ये जाऊन आत्महत्या केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी तपासावर नाराजी व्यक्त करत मुंबईत काँग्रेसकडून आंदोलन करण्यात आले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी थेट वर्षा बंगल्यावर आंदोलन सुरू केले आणि वर्षा बंगल्याला घेराव घालण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. तसेच, या ठिकाणी कार्यकर्त्यांची धरपकड होत असताना गोंधळ निर्माण झाला होता. तथापि काँग्रेसच्या आंदोलनानंतर वर्षा बंगल्याच्या परिसरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला.

# दिल्ली हादरली!

## लाल किल्ला परिसरात बॉम्ब धमाका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी (दि.१०) एक मोठा स्फोट झाल्याची घटना घडली. हा स्फोट लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ उभ्या असणाऱ्या एका गाडीमध्ये झाला आहे. या स्फोटामुळे आजूबाजूच्या तीन गाड्यांना आग लागली असून १३ जणांचा मृत्यू झाला आहे. दिल्लीतील या स्फोटानंतर संपूर्ण दिल्लीसह मुंबई आणि देशातील प्रमुख शहरांमध्येही हाय अलर्ट जारी करण्यात आला. दिल्लीतला स्फोट इतका भीषण होता की, मृत व्यक्तींचे अवयव इतरत्र उडून पडले. या घटनेत बसदेखील जळाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. तसेच, रिक्षामध्ये बसलेला एक जण उडून दूरवर पडला. त्यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण देश हादरून गेला आहे.**




राजधानी दिल्ली येथील लाल किल्ल्याचा परिसर नेहमीच गजबजलेला असतो. विशेषतः सायंकाळच्या सुमारास या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी जमते. अशावेळी हा स्फोट झाल्याने एकच खळबळ उडाली. सोमवारी सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी हा स्फोट झाल्याची घटना घडली. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की आसपास २०० ते ३०० मीटर अंतरावर स्फोटाचा आवाज ऐकू गेला. त्यानंतर लगेचच फायर ब्रिगेड या ठिकाणी पोहोचले आणि त्यांनी मदत कार्य सुरू केले. ज्या ठिकाणी पान २ वर



### दहशतवादी हल्ला- पोलीस

स्फोटाची भीषणता पाहता प्राथमिक अंदाजानुसार हा दहशतवादी हल्ला असल्याचे दिल्ली पोलिसांनी सांगितले. एका संशयितास पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. सध्या दिल्ली पोलीस, एनआयए आणि फॉरेन्सीक लॅबची पथके घटनास्थळी दाखल झाली असून तपास करत आहेत.

### डॉक्टरच्या घरातून ३०० किलो आरडीएक्स जप्त

जम्मू काश्मीर पोलिसांनी मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला आहे. त्यांनी केलेल्या कारवाईत हरियाणाच्या हरीदाबाद येथील एका मेडिकल कॉलेजमधून ३०० किलो आरडीएक्स, दोन एके४७ आणि मोठ्या प्रमाणात दारुगोळा जप्त करण्यात आला आहे. डॉ. आदिल राठरने दिलेल्या इनपूटनंतर जम्मू काश्मीर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी डॉ. आदिल राठरला जम्मू काश्मीर पोलिसांनी अटक केली होती. तसेच, त्याच्या साथीदार मुजमीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यावेळी पोलिसांना अनंतनाग येथील त्याच्या खोलीत एके ४७ आढळून आली होती. पान २ वर

## नगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर यंत्रणा सज्ज

# बॅलेट, कंट्रोल युनिटचा पुरवठा उपलब्ध



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील दहा नगरपालिकांमधील २१७ जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. मतदान प्रक्रीया सुरळीत व पारदर्शक पार पाडण्यासाठी लागणाऱ्या यंत्रणाचा पुरवठा करण्यात आला आहे. ८ हजारहून अधिक बॅलेट युनिट आणि २ हजार ९०० कंट्रोल युनिट उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, खोपोली, श्रीवर्धन, मुरूड- जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या नगरपरिषदांमध्ये १०७ प्रभाग आहेत. १२७ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. २ डिसेंबर रोजी ३०८ मतदान केंद्रामध्ये २ लाख ३७ हजार ५०३ मतदार मतदानाचा हक्क बजावणर आहेत. ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. त्याअनुषंगाने सोमवार दि.१० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरु झाली आहे. मात्र, पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नसल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

> अर्ज भरण्याच्या पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. ही प्रकीया शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन यंत्रणा सज्ज आहे. स्ट्राँग रुमसह कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम केले जाणार आहे.
>
> – सागर साळुंखे, मुख्याधिकारी तथा प्रशासक

मतदान प्रक्रीया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेमार्फत मतदान केंद्राची पाहणी करण्यापासून तेथील देखभाल दुरुस्ती करण्याची सूचना नगरपालिका बांधकाम प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात ८ हजार ७०० बॅलेट युनिट मशीन उपलब्ध आहेत. त्यातील २ हजार ४०० मशीन रत्नागिरीला पाठविण्यात आल्या आहेत. २ हजार ९०० पान २ वर

## वेधक

### रुपाली ठोंबरे-पाटील यांची हकालपट्टी



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने मागील सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द करुन नवीन प्रवक्त्यांची यादी जाहीर केली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली पाटील-चाकणकर यांच्यावर रुपाली ठोंबरे-पाटील यांनी केलेल्या आरोपांमुळे त्यांना पक्षाने नोटीस पाठवली होती. त्यामुळे रूपाली ठोंबरे यांची हकालपट्टी करण्यात आल्याचे बोलले जात आहे. तसेच, आमदार अमोल मिटकरी यांचीही प्रवक्ते पदावरुन हकालपट्टी झालेली आहे.

### दमानियांना जीवे मारण्याची धमकी



**मुंबई :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांना जीवे मारण्याची धमकी आली आहे. काही विश्वसनीय सूत्रांकडे 'माझा गेम केला जाणार' अशा गंभीर स्वरूपाचे इनपुट असल्याचे त्यांनी स्वतः सांगितले. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः फोन करून दमानिया यांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. तसेच, मनोज जरांगे पाटलांना जीवे मारण्याची धमकी मिळाली त्या फोनच्या आदल्या दिवशीच त्यांना हा इशारा मिळाला होता, असेही दमानिया यांनी सांगितले. तसेच, त्यांनी सुरक्षा देखील नाकारली आहे.

# ऑनलाईन मटका जुगारावर छापा

- **नेरळ पोलिसांची कारवाई**
- **तिघांवर गुन्हा दाखल**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ परिसरातील अनेक ठिकाणी अवैध धंदे सुरु असल्याचे सर्रास पाहायला मिळत आहे. मटका तर अनेक भागात खुलेआम सुरु असल्याचे निदर्शनास येते. दरम्यान, नेरळ गणेश घाट परिसरातील ऑनलाईन जुगार सुरु असल्याची माहिती नेरळ पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकला असून तीन जणांना ताब्यात घेत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी पदभार स्वीकारल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कठोर कारवाई सुरू आहे. त्यांच्या या कामाचे सर्वच ठिकाणी कौतुक होत आहे. अधीक्षक आंचक दलाल यांच्या आदेशानुसार म टका, जुगार आणि सट्टेबाजीसारखे गैरप्रकार काही भागात पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. परंतु, नेरळ सारख्या शहरात अद्यापही मटका जुगारासारखे अवैध धंदे सुरूच आहेत. दरम्यान, नेरळ पोलिसांना येथील गणेश घाटाजवळ ऑनलाईन जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी त्या ठिकाणी छापा टाकला. ही करवाई नेरळ गणेश घाट परिसरातील राजमाता जिजाऊ तलावाजवळ करण्यात आली असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी १५ हजार रुपयांचा मुद्देमाल व दोन मोबाईल फोन जप्त केले आहेत. तसेच, तिन्ही संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार वाघमारे हे पुढील तपास करत आहेत.

# आगीत संपुर्ण जोशी कुटुंब होरपळले



**। विटा । वृत्तसंस्था ।**

विटा येथील सावरकर नगरमध्ये भांड्याच्या दुकानाला भीषण आग लागून चौघांचा श्वास गुदमरून व भाजून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि.१०) सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. विष्णू पांडुरंग जोशी (४४), सुनंदा विष्णू जोशी (४०), प्रियंका योगेश इंगळे (२५) व सृष्टी योगेश इंगळे (२) अशी मृत्यू झालेल्यांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, येथील सावरकरनगरमध्ये जोशी यांचे श्री जय हनुमान स्टील अँड फर्निचरचे दुकान आहे. सोमवारी सकाळी अचानक दुकानला आग लागली. बघताबघता आगीने रौद्ररूप धारण केले. दुकानाच्या वरील मजल्यावर जोशी कुटुंबिय राहण्यास होते. अचानक आग लागल्याने कुटुंब भयभीत व गोंधळून गेले. घरातून बाहेर जाण्यासाठी आग लागलेल्या दुकानातून रस्ता असल्याने कुटुंबांना बाहेर पडता आले नाही. आगीने धुराचे लोट व आगीच्या ज्वालाने या कुटुंबातील चौघांचा जीव गुदमरून गेला. नागरीकांनी विटा नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाचा पाचारण केले. ही आग विझविण्यासाठी अग्निशमन दल व नागरीकांनी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. मात्र, पान २ वर

# शिरसाटांच्या सिडको घोटाळ्यावर सरकारचे मौन

## आमदार रोहित पवारांचा घाणाघात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळच्या व्यक्तीवर कारवाई होत नाही. मात्र, ज्यांचा राजकीय गेम करायचा आहे त्यांच्यावर मात्र कारवाई होते. सरकारच्या एका विभागाने सांगून सुद्धा मी समोर आणलेल्या सिडको घोटाळ्याप्रकरणी कारवाई झाली नाही; मात्र, पार्थ पवार यांच्या प्रकरणी सुपरफास्ट कारवाई केली जात आहे, असा भेदभाव न करता कारवाई करण्यात यावी, असे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

यावेळी ते म्हणाले की, एकनाथ शिंदे यांची गरज भाजपच्या सर्व नेत्यांना मुंबईच्या निवडणुकीसाठी आहे. मुंबईची निवडणूक संपली की एकनाथ शिंदे यांना टार्गेट केले जाईल. त्यांना पूर्णपणे राजकीयदृष्टया संपवण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यांच्या ठाण्यामध्ये सुद्धा त्यांना नीट राजकारण करू दिले जाणार नाही. जो व्यक्ती चुकीचा आहे त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे. सिडकोचे प्रकरण असो, नवी मुंबईमधील खडीचे प्रकरण, नाशिकमधील जमिनीचे प्रकरण, शिरसाट यांच्या एमआयडीसीचा पान २ वर

### उरणमधील वृद्धेचा संशयास्पद मृत्यू

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील मोठेभुम गावात रविवारी (दि.९) मध्यरात्री एक हादरवून टाकणारी घटना घडली. या गावातील ९० वर्षांच्या हिराबाई जनार्दन जोशी या वृद्ध महिला आपल्या राहत्या घरी मृत अवस्थेत आढळून आल्या. विशेष म्हणजे, त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस गंभीर जखमा आढळून आल्याने परिसरात संशयाचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रविवारी मध्यरात्री सुमारे १.२५ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. मृत महिला एकट्याच राहत असून त्यांना तीन मुली व एक पुतण्या आहे. त्यांच्या पुतण्याने पोलिसांत तक्रार नोंदविताना, पान २ वर




**कचरा व्यवस्थापन कोलमडले | कांदळवनात जागा असल्याचा वन विभागाचा दावा**

# शहरातील कचरा भूमीवरुन वाद

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग शहरातील कचरा भूमीवरून वाद सुरू झाला आहे. कचरा भूमीची काही जागा कांदळवनामध्ये येत असल्याचा दावा वन विभागाने केला आहे. त्यामुळे सोमवारी (दि.१०) या भूमीत कचरा टाकण्यासाठी वन विभागाने बंदी घातल्याने शहरातील कचरा ट्रक डंपरमध्येच असल्याचे समोर आले आहे.

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील शहराच्या प्रवेशद्वारासमोर कचरा भूमी आहे. या कचरा भूमीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून कचरा टाकला जातो. अलिबाग शहरासह आजूबाजूच्या ग्रामपंचायतीमधील कचरादेखील या कचरा भूमीत टाकला जात आहे. या भूमीमध्ये कचऱ्याचे व्यवस्थापन केले जाते. मात्र, सोमवारी सकाळी वन विभागाने या जागेत कचरा टाकण्यास मनाई केली. कचरा टाकण्याच्या भूमीमधील काही भाग कांदळवनामध्ये येत असल्याचा दावा वन विभागाने केला आहे. त्यामुळे या भूमीत कचरा टाकण्यास वन विभागाने पान २ वर



### शहरातील ठिकठिकाणी कचरा पडून


अलिबाग शहरातील कचरा भूमीचा काही भाग कांदळवन विभागाच्या जागेमध्ये येत असल्याचा दावा कांदळवन विभागाने केला. त्यामुळे सोमवारी या भूमीत कचरा टाकण्यास वन विभागाने मनाई केली. त्याचा परिणाम शहरातील ठिकठिकाणी कचरा पडून आहे. अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासह काही गल्लीमध्ये कचरा पडून असल्याचे दिसून आले.


> शहरातील कचरा ज्या ठिकाणी टाकला जातो. त्यातील काही जागा कांदळवन विभागाची येत असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे कचरा टाकण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र, त्यावर योग्य मार्ग काढून कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे काम केले जाईल.
>
> – सागर साळुंखे, मुख्याधिकारी तथा प्रशासक

# पोलादपूर तालुक्यात ८९० दुबार मतदार

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद आणि पोलादपूर पंचायत समितीच्या रखडलेल्या पंचवार्षिक निवडणुका तातडीने घेण्यासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तहसील कार्यालय मार्फत वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणाच्या आरक्षण प्रक्रियेनंतर दुबार आणि तिबार मतदारांचा मुद्दा राज्य निवडणूक आयोगासमोर आणल्यानंतर पोलादपूर तहसील कार्यालयाने ८९० दुबार मतदारांची नावे निश्चित केली आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार दुबार मतदारांकडून मतदानापूर्वीच मतदान


6,421 IAE6286157 194/346/99
मतदाराचे पूर्ण नांव : अहिरे निलेश नारायण
वडिलांचे नाव : अहिरे नारायण
घर क्रमांक : ६
वय : ३७ लिंग : पु **


6,765 JYV1855725 194/346/443
मतदाराचे पूर्ण नांव : अहिरे निलेश नारायण
वडिलांचे नाव : अहिरे नारायण
घर क्रमांक : ६९
वय : ४७ लिंग : पु **

केंद्र आणि यादी क्रमांकानुसार मतदान करण्याची भूमिका लेखी स्वरुपात घेण्यात येण्याचा कार्यक्रम संबंधित तलाठीमार्फत सुरू असल्याची माहिती पोलादपूरचे नायब तहसीलदार नथुराम सानप यांनी दिली आहे. दरम्यान, एकाच नावाचे भिन्न वयाचे दोन मतदार भिन्न घर क्रमांकात वास्तव्यास असल्यास त्यांचे दुबार मतदार म्हणून लेखी घेतल्यास दोन्ही पैकी एकावर अन्याय होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे उघडकीस आले आहे.

पोलादपूर तालुक्यातील माटवण येथे ११, सवाद-१ मध्ये ८, सवाद-२ मध्ये ६, धारवली येथे ९, आंग्रे कोंड येथे ४, कालवली येथे ९, तुर्भे बुद्रुक येथे १०, तुर्भे खुर्द येथे ३६, तुर्भे खोंडा येथे ५, वझरवाडी येथे १५, कापडे खुर्द येथे १०, चांभारगणी बुद्रुक येथे ४, निवे येथे २, किनेश्वर येथे १२, पैठण येथे ९, कोतवाल खुर्द येथे ११, कोतवाल बुद्रुक येथे २०, ओंबळी येथे २३, गोळेगणी येथे ८, परसुले येथे १७, कुडपण बुद्रुक येथे ११, गोवेले येथे १५, चरई येथे ७, रानवडी बुद्रुक येथे १०, बोरावळे येथे १०, बोरावळे गुडेकर कोंड येथे १४, घागरकोंड येथे ८, साखर येथे २४, चोळई येथे ८, काटेतळी येथे २७, सडवली येथे २१, धामणदेवी येथे ४, मोरगिरी येथे १८, मोरगिरी फौजदारवाडी येथे १२, देवपूर येथे ५ दुबार, कापडे बुद्रुक-१ येथे ४२, कापडे बुद्रुक-२ येथे १९, महाळुंगे येथे १५, भोगाव खुर्द येथे ३२, कोंढवी येथे ११, वडघर बुद्रुक येथे ८, कामथे येथे ५, सडे येथे ७, मोरसडे येथे २८, आडावळे बुद्रुक येथे २, बोरघर येथे १७, उमरठ येथे १५, ढवळे येथे २२, करंजे येथे १०, देवळे येथे १९, नाणेघोळ येथे ८, वाकण-१ येथे १५, वाकण-२ येथे १४, केवनाळे येथे ४, रानकडसरी येथे १, दाभळि येथे ११, दिवील येथे १२, पार्ले येथे १४, लोहारे-१ मध्ये १५, लोहारे-२ मध्ये १४, रानबाजीरे येथे ८, महालगूर येथे १८ तर पळिचल येथे २९ दुबार मतदार असल्याची नोंद प्राप्त झाली आहे.

सद्यस्थितीमध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या मतदार यादी मध्ये ८९० दुबार मतदार असल्याचे आढळून आले असले तरी पोलादपूर नगरपंचायतीच्या विविध प्रभागांमध्ये आणि नोकरीनिमित्त वास्तव्यास असलेल्या शहरांमध्ये देखील मतदार दिसून येणार आहेत. मतदान ओळखपत्र हे आधार कार्डला लिंक केले गेल्यास मतदार कोण कोणत्या ठिकाणी आणि किती वेळा मतदान करीत आहेत, त्याचा अंदाज राज्य निवडणूक आयोगाला येऊ शकणार आहे.

संभाव्य प्रारूप यादीतील मतदार संख्या १९ हजार ४३० पुरुष आणि १९ हजार ६९३ महिला अशी एकूण ३९ हजार १२७ अशी असून अंतिम मतदार यादीनुसार मतदारसंघ १९ हजार ४८५ पुरुष आणि १९ हजार ७५७ महिला अशी एकूण ३९ हजार २४२ असल्याचे ३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केलेल्या अंतिम मतदार यादीत दिसून येत आहे.

## मतदानापासून वंचित राहण्याची भिती

**मतदान यादीचा भाग क्रमांक ३४६ मतदार क्रमांक ४४३ असलेले निलेश नारायण अहिरे (४७) हे त्यांच्या गोवेले गावातील घर क्रमांक ६९ मध्ये वास्तव्यास आहेत. आणि यादीचा भाग क्रमांक ३४६ मतदार क्रमांक ९९ असलेले निलेश नारायण अहिरे (३७) हे गोवेले गावातील घर क्रमांक ६ मध्ये वास्तव्यास आहेत. त्यामुळे हे दुबार मतदार दिसून येत आहेत. या दोन व्यक्ती यादीतील छायाचित्रात वेगवेगळया दिसत असून त्यांचे वय व घर क्रमांक भिन्न दिसून येत आहे. त्यामुळे दुबार मतदारांचे परिशिष्ट १ लिहून घेताना दुबार मतदार हे एकाच नावाच्या भिन्न व्यक्ती असल्यास मतदानापासून वंचित राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

# आदि'ती' महोत्सवात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

## • विविध स्पर्धांमधून स्पर्धकांचे कलागुणांची झळाळी



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी काँग्रेस श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आयोजित 'अदि'ती' महोत्सव कार्यक्रम नुकताच नालासोपारा आशीर्वाद हॉल येथे उत्साहात पार पडला. या महोत्सवात मतदारसंघातील सुमारे ३५० महिला भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमात 'होम मिनिस्टर' स्पर्धा तसेच नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धक महिलांनी आपल्या कलागुणांची मुक्तपणे अभिव्यक्ती करत वातावरण रंगतदार केले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पैठणी, नथ, भेटवस्तू, ओव्हन, मिक्सर, इस्त्री आदी पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

होम मिनिस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक शिल्पा सीताराम दळवी-तळा, द्वितीय क्रमांक सिद्धि विनायक रिकामे मोरवने, म्हसळा, तृतीय क्रमांक सुचिता वाझे-तळा, तसेच अंतिम फेरीत पोहोचलेल्या २० महिला स्पर्धकांना नथ आणि भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. समूह नृत्य स्पर्धा विजेते प्रथम क्रमांक अनामिका नृत्य समूह-मांदाटने, द्वितीय क्रमांक, सखी सहेली ग्रुप आंबेत, म्हसळा, तृतीय क्रमांक नानवली नृत्य समूह श्रीवर्धन, वैयक्तिक नृत्य स्पर्धा विजेते प्रथम क्रमांक कुमारी स्वेता संतोष आंबेकर आंबेत, म्हसळा, द्वितीय क्रमांक कुमारी प्रेरणा उजळ गाणी, श्रीवर्धन, तृतीय क्रमांक-प्रियांका प्रशांत जाधव, हरिहरेश्वर, विशेष पारितोषिक कुमारी अनुश्री अनिरुद्ध भांबिड पोवाडा तळवडे, म्हसळ, विशेष पारितोषिक सिद्धी दिनेश जाधव संपूर्ण राष्ट्रगीत वावेहवेली, श्रीवर्धन यांना गौरवण्यात आले.

या स्पर्धांमुळे महिला भगिनींना आपल्या कलागुणांना वाव मिळाला तसेच कार्यक्रमात नवचैतन्य निर्माण झाले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे म्हसळा तालुका अध्यक्ष महेश शिर्के, तळा तालुका अध्यक्ष जनार्दन शिगवण, आणि श्रीवर्धन तालुका अध्यक्ष विश्वनाथ खांडेकर यांनी सर्व स्पर्धक व उपस्थितांचे आभार मानले आणि विजेत्यांचे अभिनंदन केले.

# मुळेखंड येथे आरोग्य शिबीर

**उरण :** ज्येष्ठ नागरिक मंडळ, मुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा व परिसर आणि शुश्रूषा हार्ट केअर सेंटर पनवेल व स्पेशालिटी हॉस्पिटल, नेरूळ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि डॉ. याशिका म्हात्रे, मुळेखंड यांच्या सौजन्याने ज्येष्ठ नागरिक मंडळ विरंगुळा केंद्र, मुळेखंड फाटा येथे नुकताच मोफत आरोग्य शिबीर भरविण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण ८३ नागरिकांनी ई.सी.जी., उच्च रक्तदाब व शुगर (मधुमेह) टेस्ट (तपासणी) करून घेतली. आरोग्य शिबीर कार्यक्रम पार पाडण्यास डॉ. क्षीरसागर (कार्डीओलॉजिस्ट), रत्नमाला भामरेकर, संजय गडकर व डॉ. याशिका म्हात्रे तसेच ज्येष्ठ नागरिक मंडळाचे कार्याध्यक्ष अनंत ल. पाटील, अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, सचिव परशुराम पाटील, उपाध्यक्ष अंकुश रामा म्हात्रे, खजिनदार ईश्वर म्हात्रे, सहसचिव सुभाष गुरव, कार्यकारिणीचे सदस्य हरिश्चंद्र म्हात्रे, कमळाकर म्हात्रे आणि केशव म्हात्रे या सर्वांचे सहकार्य लाभले. शवेटी अनंत पाटील यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम पार पाडण्यात आला.

पान १ वरून

## दिल्ली हादरली!

हा स्फोट झाला ते ठिकाण लाल किल्ल्यापासून फक्त ८०० मीटर अंतरावर आहे. त्यामुळे या स्फोटाकडे संशयाच्या नजरेतून पाहिले जात आहे. या स्फोटातून तेरस जणांचा मृत्यू झाला असून, तीसहून अधिक जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, काही गाड्यांचे फक्त सांगाडे उरले आहेत. या स्फोटानंतर लाल किल्ला परिसर तातडीने रिकामा करण्यात आला. सुरक्षा यंत्रणांनी या परिसराचा ताबा घेतला. त्यानंतर एनएसजीचे वरिष्ठ अधिकारी या ठिकाणी पोहोचले. लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक एकजवळ पार्किंगमध्ये असलेल्या कारमध्ये हा स्फोट झाला आहे. या घटनेनंतर राजधानी दिल्लीमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच, आर्थिक राजधानी मुंबईसह देशातील प्रमुख शहरांमध्येही हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. गेल्या चार दिवसांत ७ ते १० नोव्हेंबर या दरम्यान दिल्ली पोलिसांनी कारवाई करत काही संशयितांना पकडले आहे. त्यामध्ये आयसिसच्या चार दहशतवाद्यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात स्फोटकंही जप्त करण्यात आले आहे. त्याच पार्श्वभूमीवर लाल किल्ल्याजवळ झालेल्या या स्फोटामुळे संशय अधिक बळावला आहे.

### डॉक्टरच्या घरातून ३०० किलो आरडीएक्स जप्त

पोलिसांनी त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता, हरियाणाच्या मेडिकल कॉलेजच्या खोलीत दारुगोळा असल्याचे त्यांनी सांगितले होते. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई करत हरियाण्याच्या फरिदाबाद येथील वैद्यकीय महाविद्यालयात छापा टाकला. यावेळी डॉक्टर मुजमीलच्या खोलीत पोलिसांनी मोठ्या प्रमाणात आरडीएक्स, दारुगोळा आणि दोन एके ४७ आढळून आल्या. पोलिसांनी ही स्पोटके ताब्यात घेतली आहेत. याद्वारे देशात मोठा घातपात करण्याचा प्रयत्न होता का, याचा तपासही पोलिसांनी सुरु केला आहे.

याशिवाय दोघे डॉक्टर कोणत्या दहशतवादी संघटनेशी संबंधित आहे. तसेच, याप्रकरणात आणखी कोण कोण सहभागी आहेत, त्याचे नेटवर्क कुठे आहे. याचा तपासही पोलीस करत आहेत. श्रीनगर आणि हरियाणा पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली आहे. हे दोघे डॉक्टर जैश-ए-मोहम्मद किंवा गजवत-उल-हिंद या संघटनांशी संबंधित असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## बॅलेट व कंट्रोल युनिटचा पुरवठा उपलब्ध

कंट्रोल युनिट असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहेत. दीर्घ कालावधीनंतर नगरपरिषदांच्या निवडणुका होत आहेत. ही प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणादेखील कामाला लागली आहे. वेगवेगळ्या विभागातील अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन आचारसंहितेचा भंग होऊ नये, म्हणून कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. नगरपालिका स्तरावर स्ट्राँग रुम असणार आहे. नगरपरिषद कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण घेतले जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देणयात आली आहे.

## आगीत जोशी कुटुंबियांचा मृत्यू

आग आटोक्यात येत नव्हती. त्यानंतर पलूस, कडेगांव येथील अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलातील जवानांनी नागरिकांच्या मदतीने खिडकी व भिंत फोडून दुकानाच्या वरच्या मजल्यावर अडकलेल्या चौघांना बाहेर काढले. मात्र, तोपर्यंत ते गंभीर जखमी झाले होते आणि त्यांचा श्वास गुदमरला होता. जखमींना विटा येथील खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु, उपचार सुरू असताना जोशी कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाला. दरम्यान, ही आग शॉर्ट सर्किटने लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे.

## उरणमधील वृद्धेचा संशयास्पद मृत्यू

वृद्ध महिला पडून जखमी होऊन मृत झाल्याची माहिती दिली. त्यानंतर घटनास्थळी फॉरेन्सिक पथक व आय-बाईक टीमला बोलावून पंचनामा करण्यात आला. त्या वृद्धेच्या मृतदेहाचे पोस्टमार्टम करण्यात आले असून अहवालाची प्रतीक्षा आहे. तसेच, नेमक्या जखमा कशामुळे झाल्या, हे स्पष्ट होण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. या घटनेने मोठेभूम गावात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.

## शिरसाटांच्या सिडको घोटाळ्यावर सरकारचे मौन

मुद्दा असे अनेक मुद्दे आहेत. संजय शिरसाट यांनी जो ५ हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला त्यावर बोलावे. त्यांच्याबद्दल तुम्ही तोंड उघडत नाही आणि नको त्या विषयावर जर तुम्ही तोंड उघडत असाल, तर एकदा समोरासमोर येऊद्यात. गेली ८ दिवस माझी तब्येत खराब होती म्हणून मी काही बोललो नाही. पार्थ पवारप्रकरणी त्यामुळेच माझी काही प्रतिक्रिया दिसली नाही. कुठलीही जर गोष्ट कायदेशीर नसेल, तर तुमच्यावर कारवाई झाली पाहिजे, त्यामध्ये खरे काय, खोटे काय हे लोकांसमोर आले पाहिजे. कुठलाही निर्णय एकटा व्यक्ती घेत नसतो. अधिकारी गरिबांची कामे का करत नाही. कारवाई होत असताना त्यात भेदभाव होऊ नये.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्री तुम्ही लोकांवर लक्ष ठेवून आहात, पण मुंबईमधील भाजपचे कार्यालयाबाबत स्पष्टीकरण दिले पाहिजे. सरकारी कुठलीही जमीन कोणत्याही पक्षाला देता येत नाही, ती देऊ नये, अशी आमची भूमिका आहे. भाजपला आता कुबड्यांची गरज संपलेली आहे. अमित शहा यांनी इथे येत सांगितले आहे की, 'कुबड्यांची गरज नाही'. म्हणूनच त्या तोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून मोठ्या प्रमाणात जमीन घोटाळे झाले आहेत, असा आरोप रोहित पवार यांनी केला आहे.

## शहरातील कचरा भूमीवरून वाद

मनाई केली आहे. वन विभागाचे कर्मचारी सोमवारी या जागेत आले. तेथील पाहणी करून हद्द कायम करण्याचे काम त्यांनी केले. कांदळवन विभागीय वन अधिकारी यांच्याकडून ही कारवाई सुरू केली आहे. त्याचा परिणाम शहरातील कचरा आज ट्रक, डेम्पोमध्येच सकाळपासून पडून असल्याचे दिसून आले आहे. दर दिवशी सुमारे १२ टनाहून अधिक कचऱ्याची विल्हेवाट या भूमीत लावली जाते. मात्र, वन विभागाच्या या कारवाईने कचरा कुठे टाकायचा, असा प्रश्न नगरपालिकेसमोर उभा राहणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**शहरातील कचरा ज्या भूमीत टाकला जातो, तेथील काही भाग कांदळवनामध्ये येतो. त्यामुळे कचरा टाकू नये, अशी सूचना नगरपालिकेला दिल्या असून, हद्द कायम करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.**

**– कुलदीप पाटकर, वन परिक्षेत्र अधिकारी, कांदळवन विभाग, अलिबाग**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक १) सुनीलकुमार दीनबंधु हिंगड, २) शर्मिला उमेश जोशी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे - पिंपळोली बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत.**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| २७ | १ ब | ०-२१-०० | २-७५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, 'लक्ष्मी सदन', जुने एस.टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि.रायगड.



### ग्रुप ग्रामपंचायत होडगाव

**ता. माणगाव जि. रायगड**

**जाहीर निविदा** — नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि १०/११/२०२५

गुप ग्रामपंचायत होडगाव ता.माणगांव जि. रायगड यांजकडून खालील कामाकरिता जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि १८/११/२०२५ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय होडगाव येथे दुपारी १२.०० वाजेपर्यंत सादर करावे.

| अ. क्र. | कामाचे नांव/साहित्याचे नाव | योजेनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | कोरे निविदा फार्म फी | १% इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हातकेली शाळा शौचालय दुरूस्ती व पाणी सुविधा (२०२०/२१ | १५ वा वित्त आयोग | १००००० | ३ महिने | १०० | १००० |
| २ | महिला जीवन कौशल्य प्रशिक्षण (२०/२१ ) | १५ वा वित्त आयोग | ५०००० | ३ महिने | | ५०० |
| ३ | विंचवली शाळा शौचालय दुरूस्ती (२०/२१ ) | १५ वा वित्त आयोग | ५०००० | ३ महिने | | ५०० |
| ४ | शाळांकरिता आवश्यक साहित्य खरेदी फर्निचर २०२०/२१) | १५ वा वित्त आयोग | ४४५४८ | ३ महिने | | ४४५ |
| ५ | शाळांकरिता पाणी शुद्धीकरण आरो खरेदी २०२१/२२ | १५ वा वित्त आयोग | ९०००० | ३ महिने | | ९०० |
| ६ | अपंगाना स्वच्छता विषयक साहित्य व उपकरणे पुरविणे २०२१/२२, २०२२/२३ | १५ वा वित्त आयोग | ६०२२३ | ३ महिने | | ६०२ |
| ७ | अंगणवाडी करिता फर्निचर पुरविणे २०२१/२२ | १५ वा वित्त आयोग | ६७१२४ | ३ महिने | | ६७१ |
| ८ | सौरदिप खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग | १००००० | ३ महिने | | १००० |
| ९ | महिलांकरिता सॅनेटरी नॅपकिन खरेदी करणे २०२१/२२, २०२३/२४ | १५ वा वित्त आयोग | ९८७५० | ३ महिने | | ९८७ |
| १० | कचराकुंड्या खरेदी करणे २०२२/२३ | १५ वा वित्त आयोग | ७७८११ | ३ महिने | | ७७८ |
| ११ | महिलांकरिता आरोग्य शिबिर २०२२/२३ | १५ वा वित्त आयोग | ५०००० | ३ महिने | | ५०० |
| १२ | टी सी एल पावडर व क्लोरोवॅट खरेदी २०२३/२४ | १५ वा वित्त आयोग | ६०००० | ३ महिने | | ६०० |
| १३ | शाळा अंगणवाडी ओला व सुका कचरा डजबिन खरेदी २०२४/२५ | १५ वा वित्त आयोग | ५०००० | ३ महिने | | ५०० |
| १४ | शाळेतील मुलांना स्कॉलरशीप व नवोदय पुरस्कृत २०२४/२४ | १५ वा वित्त आयोग | २५६०८ | ३ महिने | | २५६ |
| १५ | अंगणवाड्यांना स्वच्छता संदेश व रंगरंगोटी २०२४/२५ | १५ वा वित्त आयोग | ५०००० | ३ महिने | | ५०० |
| १६ | अंगणवाडयाना डीजिटल वजन काटे खरेदी २०२४/२५ | १५ वा वित्त आयोग | १८२४३ | ३ महिने | | १८२ |
| १७ | विंचवली बस थांबा बांधणे | १५ वा वित्त आयोग | १२४७४७ | ३ महिने | | १२४७ |
| १८ | शाळांना सोलर/CCTV बसविणे | १५ वा वित्त आयोग | ८०००० | १ महिना | | |

**अटी व शर्ती:**

१. प्राप्त निविदा दि.१८/११/२०२५ रोजी दु. १२.०० वाजता ग्रा. प. होडगाव येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२. निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी
३. कोणतेही कारण न देना एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४. कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील
५. निविदा मजूरी अंती ठेकेदार/पुरवठादार यास रितसर करारनामा करून घावा लागेल.
६. कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहीत केलेल्या मुदतीचे काम पुर्ण करणे बंधणकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व ज्ञाप्ती लागू करण्यात येईल.
७. साहित्य व वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली आहे.
८. निधीच्या उपलब्धतेनुसार देयक अदा केली जातील.
९. नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल.
१०. ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असाये व प्रणालीशी संलग्न असावे.
११. कायद्याचा देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत होडगाव**
**ता.माणगांव जि.रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत होडगाव**
**ता.माणगांव जि.रायगड**



### ग्रामपंचायत चिरनेर

**मु.पो. चिरनेर, ता. उरण, जि. रायगड, पिन-४१०२०६**

**जावक क्र : ४६५** — **दिनांक : ११/११/२०२५**

**निविदा सूचना**

ग्रामपंचायत चिरनेर खालील कामाकरीता निविदा मागवित असून त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म मिळविण्याची मुदत | निविदा स्विकारण्याची तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत चिरनेर येथील सार्वजनिक इमारत दुरूस्ती करणे ग्रामनिधी सन २०२४-२०२५, सन २०२५-२०२६ | ७,६३,४०८ | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| २ | ग्रामपंचायत चिरनेर येथील गटार दुरूस्ती करणे ग्रामनिधी २०२५-२०२६ | १,९९,६१८ | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ३ | महिला व बचत गटांना व्यवसाय प्रशिक्षण देणे, १५ वा वित्त आयोग सन २०२०-२१ | ५००००/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ४ | महिला व बचत गटांना व्यवसाय प्रशिक्षण देणे, १५ वा वित्त आयोग सन २०२१-२२ | ५००००/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ५ | शेतकऱ्यांना शेतीविषयक प्रशिक्षण देणे १५ वा वित्त आयोग सन २०२२-२३ | ५९५६७/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ६ | प्राथमिक शाळांना शैक्षणिक साहित्य खरेदी करणे, १५ वा वित्त आयोग सन २०२२ | १०००००/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ७ | चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील महिला व मुलींना व्यवसाय प्रशिक्षण देणे. १५ वा वित्त आयोग सन २०२३-२०२४ | ५००००/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ८ | ग्रामपंचायत क्षयरोग मुक्त करणे करणे, १५ वा वित्त आयोग सन २०२४-२०२५ | २५०००/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ९ | मुली व महिलांना व्यवसायासाठी प्रोत्साहन देणे १५ वा वित्त आयोग सन २०२४-२०२५ | १०००००/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| १० | ग्रामपंचायत क्षयरोग मुक्त करणे १५ वा वित्त आयोग सन २०२५-२०२६ | ५००००/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ११ | योग शिबीर घेणे, १५ वा वित्त आयोग सन २०२५-२०२६ | ५००००/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| १२ | अंगणवाड्यांना शैक्षणिक साहित्य खरेदी करणे. १५ वा वित्त आयोग सन २०२५-२०२६ | ५४१५८/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |
| १३ | मुली व महिलांना पौष्टिक खाद्य पुरविणे, १५ वा वित्त आयोग सन २०२५-२०२६ | १८१६६३/- | दि. ११/११/२०२५ ते दि. १८/११/२०२५ | दि. १८/११/२०२५ दुपारी १२.०० वाजता | दि. १९/११/२०२५ वेळ दुपारी २.०० वाजता |

**शर्ती व अटी :-**

१. सदरचे ठेकेदार शासनाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
२. सदरचे काम केलेले अनुभवाचे दाखले जोडणे आवश्यक आहेत.
३. सदर कामाचे ॲडव्हान्स रक्कम देता येणार नाही. जसे काम होईल त्याप्रमाणे बिल अदा केले जाईल.
४. सदर काम तांत्रिक अधिकाऱ्याच्या देखरेखीसाठी स्पेसिफिकेशन नुसार करणेचे आहे. तसेच सदर कामावर ग्रामपंचायत कमिटीची देखरेख होईल.
५. सदरचे कामापोटी ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम बिलांतून कापली जाईल.
६. सदरच्या कामाचे तांत्रिक अधिकाऱ्याच्या मुल्यांकनानुसार कामाचे बिल अदा केले जाईल.
७. सदर कामाचे निविदा पत्रक अट नं. १ व २ या कागदपत्रांची पूर्तता केल्याखेरीज ठेकेदाराने स्वतः किंवा ठेकेदाराने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीद्वारा निविदा देण्यात येईल.
८. अंतिम निविदा स्विकृतीनंतर योग्य त्या किंमतीचा दस्तऐवज ठेकेदाराने स्वतः खरेदी करून ग्रामपंचायत यांचेसोबत करारनामा करावयाचा आहे.
९. सदर कामामध्ये साहित्याच्या किंमतीचे बाजारभावामध्ये वाढ झाल्यास रेती, खडी, स्टील व सिमेट कोणत्याही वाढीव रक्कम देण्यास ग्रामपंचायतीवर बंधनकारक राहणार नाही.
१०. सुरक्षा अनामत रक्कम सदर कामाचे अंतिम बिल झाल्यानंतर ६ महिन्याचे कालावधीनंतर अदा केले जाईल.
११. कोणतेही कारण न देता एक अगर सर्व निविदा नामंजूर करण्याचा अधिकार खालील सह्या करणाऱ्याने (सरपंच यांनी) राखून ठेवला आहे.
१२. सर्व कागदपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित करून सादर करण्यात यावीत.

## नि|व|ड|क



### किडनी स्टोनवर लेझर शस्त्रक्रिया

**कोर्लई** : मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे उभारण्यात आलेल्या सर्व सोयींनी सुसज्ज अशा आयुष हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रथमच किडनी स्टोनवर यशस्वी लेझर शस्त्रक्रिया करण्यात आल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना सेवेत आशेचा किरण दिसला आहे. नांदगाव येथे नुकतेच शंभर खाटांचे मल्टिस्पेशिलिटी रुग्णालय सुरु करण्यात आले असून, रुग्णालयात अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह स्त्रियांचे आजार, नेत्रविकार, लहान मुलांचे व हाडांचे आजारावर उपचार केले जातात, तसेच याठिकाणी नाक, कान, घसा, दंत, फिजिओथेरपी, नवजात बालक अतिदक्षता विभाग, वैद्यकीय तज्ज्ञ असून, अत्याधुनिक शस्त्रक्रियागृह, सुसज्ज अपघात आणि अतिदक्षता विभाग तालुक्यासह रायगडवासियांसाठी वरदान ठरणार आहे. या हॉस्पिटलमध्ये प्रथमच किडनी स्टोनवर भूलतज्ज्ञ डॉ. सोव्हिल, लेप्रोस्कोपिक युरोसर्जन डॉ. सौरभ, असिस्टंट सर्जन डॉ. ऋतुज माळी, लेसर तज्ज्ञ डॉ. राजेश यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### रस्त्याचे डांबरीकरण होणार

**रसायनी** : रसायनी कॉर्नर ते कष्टकरी नगर या रस्त्याची



दुरवस्था झाल्याने या रस्त्यावरुन प्रवास करताना नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. जुनी पोसरी, ठाकूरवाडी, कष्टकरी नगर, तुराडे व आसपासच्या गावांतील नागरिक याच रस्त्यावरुन प्रवास करतात. या रस्त्याची दुरवस्था झाल्याने शाळकरी विद्यार्थी, कामगारवर्ग यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. या रस्त्याचे डांबरीकरण अथवा कॉंक्रिटीकरण व्हावे यासाठी बजरंग दलाचे सुभाष कोकणे यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याला पत्रव्यवहार करुन दि. २९ एप्रिल रोजी ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम खात्याने आंदोलन मागे घेण्यास सांगितले. आणि पाऊस सुरू होण्यापूर्वी काम पूर्ण करून देऊ असे आश्वासन दिले होते. पावसाळाही संपला तरी रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष झाल्याने बजरंग दल आंदोलनाच्या पावित्र्यात आहे. येत्या दहा दिवसांत रसायनी कॉर्नर ते कष्टकरीनगर या रस्त्याचे काम सुरु करुन रस्ता पूर्ण करु, असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता मिलिंद कदम यांनी दिले आहे.



### अनधिकृत पार्किंगला लागणार चाप

**पनवेल** : पनवेल शहर व नवीन पनवेल परिसरात अनेक महिने बंद असलेल्या टोइंग व्हॅन गेल्या काही दिवसांपासून पुन्हा रस्त्यावर सुरु झाल्या आहेत. टोईंग व्हॅनवरील कर्मचारी आणि वाहतूक पोलिसांबाबत तक्रारी आल्याने यंत्रणा तात्पुरती बंद करण्यात आली होती. पनवेल व नवीन पनवेल परिसरात टोइंग व्हॅन यंत्रणा बंद असल्याने रस्तोरस्ती नियमबाह्यपणे वाहने उभी करण्यात येत आहेत. त्याला आळा घालण्यासाठी वाहतूक शाखेने पुन्हा टोइंग व्हॅन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाहतूक शाखेने सम-विषम पार्किंग, बेशिस्त पार्किंग यावर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नागरिकांनी रस्त्यावर वाहने पार्क करताना ती योग्य ती ठिकाणी पार्क करावी, असे आवाहन वाहतूक शाखेने केली आहे. तसेच शाळा, हॉस्पिटल तसेच मार्केट परिसरात वाहने पार्क करू नयेत जेणेकरून इतरांना त्रास होईल, असे पार्किंग करू नये अशी मागणी केली आहे. यावेळी वाहतूक पोलिसांनी व्हॅनवर उद्घोषक बसवण्यात आल्याचे सांगितले. कारवाईदरम्यान उद्घोषक वरून नागरिकांना चुकीच्या ठिकाणी असलेले पार्किंगमधील वाहने काढण्याचे आवाहन करण्यात येत आहे. यावेळी वाहनचालकांनी नागरिकांना सेवेऐवजी त्रासच अधिक होतो, शिवाय दुजाभाव होतो. हे बदल करून कारवाई पारदर्शकता असावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पन्हळघर धरणाचे काम अपूर्णच!



#### शेतकऱ्यांची स्थिती

या धरणामुळे पाणी मिळेल या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी भातशेतीपासून कडधान्ये आणि फळबागांकडे वळण्याचा प्रयत्न केला. परंतु कालवे आणि वितरण यंत्रणा तयार नसल्याने पाणी फक्त जलाशयात साठते, शेतात पोहोचत नाही. त्यामुळे ‘‘पाणी दिसते पण मिळत नाही’’ अशी परिस्थिती झाली आहे.

■ **नेत्यांची उदासीनता, शासनाचे दुर्लक्ष**

■ **शेतकरी अडचणीत, पाणीटंचाईची समस्या कायम**

#### राजकीय उदासीनता

तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्या संकल्पनेतून १९८० मध्ये पन्हळघर धरणाला मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात या धरणाचे काम १९९० मध्ये सुरू झाले. मात्र, राजकीय उदासीनतेमुळे धरण उशाला आणि कोरड घशाला अशी अवस्था पाणी टंचाईग्रस्त भागातील जनतेची झाली आहे. स्थानिक मंत्री, खासदार, आमदार या लोकप्रतिनिधींकडून सातत्यपूर्ण पाठपुरावा झाला नाही. त्यामुळे तब्बल ३५ वर्षे हे धरण रखडले आहे. पूर्वी कुंभे विद्युत प्रकल्प धरण आणि पन्हळघर धरण हा परिसर तत्कालीन मंत्री आणि खासदार सुनील तटकरे यांच्या मतदारसंघात समाविष्ट होता. आता मंत्री भरत गोगावले यांच्या मतदारसंघात आहे. आज ३५ वर्षांहून अधिक काळ लोटला तरीसुध्दा दोन्ही धरणे रखडलेल्या अवस्थेत आहेत, हे येथील जनतेचे दुर्दैवच आहे.

#### पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम

रायगड किल्ल्याजवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठालगत आणि मुंबई-गोवा महामार्गानजीक असलेल्या या धरणाखाली गेलेल्या काही गावे अजूनही पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत.

**| माणगाव | प्रतिनिधी |**

तालुक्यातील पन्हळघर धरण हे रायगड जिल्ह्यातील एक अत्यंत महत्त्वाकांक्षी जलसंपदा प्रकल्प मानला जातो. सिंचन, पिण्याचे पाणी, औद्योगिक वापर आणि पर्यटन अशा सर्व अंगांनी हा प्रकल्प माणगाव तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचा पाया ठरावा, अशी अपेक्षा होती. पण, दुर्दैवाने आज तीन दशकांनंतरही हे धरण पूर्णत्वास आलेले नाही. लाखो रुपयांचा खर्च, लोकांच्या जमिनीचे विस्थापन आणि शेकडो स्वप्नं आजही अर्धवट राहिली आहेत.

पन्हळघर धरणाची संकल्पना १९९० च्या दशकात तयार झाली. उद्दिष्ट होते माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनाचे स्थिर साधन उपलब्ध करून देणे आणि शहर तसेच औद्योगिक वसाहतींना पाण्याचा पुरवठा करणे. सुमारे ९८ कोटींचा खर्च दाखवून या प्रकल्पाला शासनमान्यता देण्यात आली. प्रारंभीचे काम जोमाने सुरू झाले. धरणाची भिंत बांधण्यात आली, सांडव उभारण्यात आला, काही प्रमाणात जलसाठा झाला... पण नंतर कामाचा वेग मंदावला. आजही मुख्य जलवाहिनी, कालवे, पंपिंग स्टेशन आणि वितरण यंत्रणा पूर्ण झालेली नाही.

या प्रकल्पाचे अपूर्ण राहण्यामागे अनेक प्रशासकीय आणि तांत्रिक कारणे आहेत. अपुरा निधी आणि तुकड्या-तुकड्याने मंजुरी, सुरुवातीस मोठा निधी मंजूर झाला असला तरी नंतर वार्षिक हप्त्यांमध्ये निधी मिळत गेला. त्यामुळे काम थांबणे, ठेकेदार बदलणे, आणि यंत्रसामुग्रीची झीज या समस्या सतत आल्या. भूसंपादन आणि पुनर्वसनातील अडथळे, धरणाखाली गेलेल्या गावातील लोकांचे पुनर्वसन नीट झाले नाही. अनेक शेतकऱ्यांना आजही संपूर्ण भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणे वाढली आणि काम ठप्प झाले. तांत्रिक देखरेख आणि नियोजनातील त्रुटी समोर आल्या आहेत. सुरुवातीच्या आराखड्यात काही तांत्रिक चुका झाल्याने पाण्याचा प्रवाह आणि जलसाठा अपेक्षेपेक्षा कमी झाला. नंतर सुधारणा सुचवण्यात आल्या पण त्या कधीच राबवल्या गेल्या नाहीत.

# निविदा उघडण्याआधीच ठेकेदाराकडून काम सुरू



■ **जिल्हा रुग्णालयातील अजब प्रकार उघड**

■ **वरिष्ठ अधिकारी ठेकेदारावर मेहेरबान?**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याआधीच ठेकेदारावर सार्वजनिक बांधकाम विभाग मेहेरबान झाल्याने अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात विद्युत दुरुस्तीचे काम जोरात सुरू असल्याचे दिसून आले आहे. याबाबत कृषीवलने ८ नोव्हेंबर रेजी ‘निविदा प्रक्रियापूर्वीच ठेका’ या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करीत संबंधित विभागाचे बिंग फोडले होते. त्यामुळे निविदा मागविण्याची मुदत संपण्याच्या आधीच काम सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी ठेकेदाराला काम देऊन ‘अर्थ’पूर्ण संबंध जपल्याची चर्चा जोरात सुरू आहे.

अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील विद्युत कामाची निविदा पूर्ण झाली नसताना ठेकेदारांकडून काम केले जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसताना ठेकेदाराने काम सुरु केल्याचा आरोप होत आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत दोडे यांनी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसताना कामकाज सुरू असल्यास कारवाई करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया दिली होती. परंतु, सगळा अनागोंदी कारभार समोर असतानाही कारवाई होत नसल्याने नक्की पाणी कुठे मुरतेय, याबाबत उलटसुलट चर्चा होताना दिसत आहे.

या कामांसाठी तीस लाख रुपयांहून अधिक निविदा काढण्यात आली आहे. निविदा ३१ ऑक्टोबरपासून मागवण्यात आल्या असून, त्याची अंतिम दि. ८ नोव्हेंबर होती. त्यानंतर ११ नोव्हेंबरला निविदा उघडली जाणार होती. परंतु, त्याअगोदरच एका ठेकेदारामार्फत रुग्णालयातील काम सुरू झाले आहे. याबाबत नक्की गौडबंगाल काय, असा सवाल विचारला जात आहे. त्यामुळे ही सर्व निविदा प्रक्रियाच आता संशयाच्या भोवऱ्यात आहे. दरम्यान, याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांना संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही.

# उरणमध्ये खासगी शाळा, क्लासेसचा ‘रिसॉर्टी’ धंदा

■ **विद्यार्थ्यांच्या सहलींच्या नावाखाली जीवाशी खेळ**

■ **शिक्षण विभागाचे डोळे मिटलेलेच**

**| उरण | प्रतिनिधी |**

शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी असतात, पण उरणसह राज्यभरातील काही खासगी शाळा आणि क्लासेसनी या शैक्षणिक संकल्पनेचा चक्क ‘रिसॉर्ट सफरी’मध्ये रूपांतर केल्याचे स्पष्ट झाले आहे.

उरण तालुक्यातही अनेक खासगी शाळा शैक्षणिक सहलींच्या नावाखाली वॉटर पार्क, रिसॉर्ट आणि मनोरंजन स्थळांवर सहली नेत आहेत. गड-किल्ले, विज्ञानकेंद्र, तारांगण,



संग्रहालये अशा ज्ञानवर्धक ठिकाणी सहली नेण्याचे बंधन असतानाही, शाळा आणि शिक्षक मात्र ‘कमिशन’ मिळणाऱ्या ठिकाणांकडे विद्यार्थ्यांना वळवत आहेत. उरण तालुका मराठी पत्रकार संघ यांच्याकडून या संदर्भात वारंवार तक्रारी करण्यात आल्या असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताशी खेळ करणाऱ्या शाळा व क्लासेसविरुद्ध तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी गटशिक्षणाधिकारी घरत मॅडम व गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांच्याकडे केली आहे.

### धुळीचे साम्राज्य

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

तालुक्यातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडले असून, वाहनचालकांना वाहने चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यातच मागील दोन दिवसांपासून पाऊस गेल्याने रस्त्यावरील चिखल सुकून मोठ्या प्रमाणात धुळीचे लोट उसळत आहेत. त्यामुळे वाहनचालकांच्या नाका-तोंडात धूळ जाऊन आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आता तरी संबंधित विभागाने रस्त्यांच्या डागडुजीची कामे हाती घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून व्यक्त करण्यात येत आहे. परंतु, संबंधित विभाग अद्याप बघ्याच्या भूमिकेत आहे.

# किहीम पक्षीसंवर्धनासाठी कार्यशाळा



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अरण्यऋषी मारुती चितमपल्ली (दि. ५ नोव्हेंबर) आणि पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सालिम अली (दि. १२ नोव्हेंबर) यांच्या जन्मदिनाच्या मधल्या काळात राज्यभरात पक्षीसप्ताह महाराष्ट्रात राबवण्यात येतो. पक्षीसंवर्धन आणि जनजागृती करण्यासाठी दरवर्षी या सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. बॉम्बे नॅचुरल हिस्ट्री सोसाईटी, मुंबई यांच्या पुढाकाराने अलिबाग तालुक्यातील किहीम येथे नुकतेच कार्यालय सुरू करण्यात आले असून, याठिकाणी पक्षीसप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, जगविख्यात पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सालिम अली यांचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम हात घेण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आणि पक्षीसप्ताहानिमित्त ‘किहीम पर्यटन गाव-पक्षीओळख आणि पक्षीशास्त्र’ या विषयावर आधारित दि. ८ व ९ नोव्हेंबर रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. ही कार्यशाळा बॉम्बे नॅचुरल हिस्ट्री सोसायटीचे संचालक किशोर रिठे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ उच्च महाविद्यालय, चोंढी-किहीम येथे भरवण्यात आली होती. दरम्यान, बॉम्बे नॅचुरल हिस्ट्री सोसायटीचे कार्यक्रम अधिकारी नंदकिशोर दुधे व प्रकल्प सहायक रोहन चव्हाण यांनी किहीम व त्यालगतच्या गावांमधील २० पेक्षा अधिक स्थानिक युवकांना, वनविभागातील कर्मचारी व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना पक्षीओळख व पक्षीशास्त्र या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला प्राचार्य लीना पाटील व पक्षीमित्र प्रदीप कवळे उपस्थित होते.

# पाल्हे पुलावरुन अवजड वाहतूक सुरूच

**| चौल | प्रतिनिधी |**

अलिबाग, मुरुड तालुक्यांना जोडणारा सहाण बायपास मार्गावरील पाल्हे पूल कमकुवत झाला असून, सुरक्षेच्या कारणास्तव या पुलावर अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घातली आहे. यासाठी येथे काही दिवसांपासून पोलीसही बसविण्यात आले आहेत. मात्र, तरीही अवजड वाहनांची वाहतूक दिवसाढवळ्या आणि जास्त करुन रात्रीच्या वेळी सुरूच असल्याने येथे अपघाताचा धोका वाढला आहे.

या परिसरातून रस्त्याच्या कामासाठी जाणारे हायवा, ट्रक-ट्रेलर, डंपर तसेच अवजड मशीन वाहून नेणारी वाहने दररोज या पुलावरून जातात. विविध शाळांच्या बस, स्थानिक बांधकामासाठी वापरले जाणारे ट्रक, एसटी बसचीही

#### सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



वाहतूक याच पुलावरून होते. या पुलावर त्यामुळे हा जीर्ण पूल कोसळल्यास नवल वाटायला नको, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

अलिबागमार्गे मुरुड, रेवदंडा, नागावकडे जाणारा रस्ता याच पुलाद्वारे जातो. सध्या पुलाचा पाया, खांब आणि स्लॅब धोकादायक अवस्थेत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने पूल अवजड व उंच वाहनांसाठी बंद केला आहे. मात्र, अजूनही या पुलावरून अवजड वाहतूक होत असल्याने येथे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

#### वेळीच लक्ष न दिल्याचा परिणाम

पाल्हे पूल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे. परंतु, योग्य वेळी लक्ष न दिल्याने आज या पुलाची दुरवस्था झाली आहे. याला सर्वस्वी बांधकाम विभाग जबाबदार आहे. एकाच वेळी बेली आणि पाल्हे पुलाजवळ ‘पूल कमकुवत’ असे सूचना फलक लावून जबाबदारी झटकण्यापलीकडे बांधकाम विभागाने काहीच केलेले नाही, असा आरोप नागरिक करीत आहेत. त्यामुळे जर पूल कोसळला, तर त्याला बांधकाम विभागाचा दुर्लक्षित कारभार जबाबदार असेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

### मोऱ्या धोकादायक

**| चौल | प्रतिनिधी |**

अलिबाग-रेवदंडा मुख्य मार्गावरील कुरुळ-बेलकडे गावच्या हद्दीत रस्त्यावरील मोऱ्यांचे संरक्षक कठडे दोन वर्षांपासून गायब झाले आहेत. याबाबत वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधण्यात आले आहे. परंतु, संबंधित विभागाचे अधिकारी कामामध्ये इतके व्यस्त आहेत की, त्यांना या कामाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. अनेकदा याठिकाणी अपघात झाले आहे. मोठा अपघात होऊन एखाद्या निष्पापाचा जीव जाण्याची वाट बांधकाम विभाग पाहतेय का, अशी विचारणा नागरिकांकडून होत आहे. परंतु, प्रत्येक वेळी बांधकाम विभाग रस्ता आमच्या अखत्यारित नाही, एवढे सांगून जबाबदारी झटकण्याचे काम करीत आहे.

# रोह्यात भात झोडणीला वेग

**| चणेरा | प्रतिनिधी |**



गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कपाळावर चिंता उमटली होती. आधीच पिके तयार असूनही पावसाच्या सरींनी कापणी आणि झोडणीचं काम थांबवून ठेवलं होतं. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे पुन्हा एकदा शेतात जिवंतपणा आला आहे. शेतकरी उसरं-सुरलं कष्टाचं सोनं पदरात पाडून घेण्यासाठी धावपळ करताना दिसून येत आहे.

धाटाव, कोलाड, खांब, पुगाव, किल्ला, घोसाळे, चणेरा, भालगाव, यशवंतखार, तांबडी, वाली यांसारख्या गावांमध्ये भात झोडणीला आता वेग आला असून, सर्वत्र ओलसर मातीचा सुगंध आणि धान्याचा सुवास पसरला आहे. शेतकरी सकाळच्या पहाटेपासून संध्याकाळपर्यंत शेतात राबत आहेत. दांडी, पिंप आणि वाऱ्याच्या झुळकीत झोडल्या जाणाऱ्या धान्याचा सोनेरी पाऊस पाहून त्यांच्या डोळ्यांतील थकवा हरवतोय. लांडर गावचे शेतकरी संकेत खेरटकर यांनी आता भातझोडणीला सुरुवात केली. उरलेलं कष्टाचं सोनं मिळालं हेच समाधान असल्याचे म्हटलेआहे.

इतिहासप्रेमाचा अद्भुत नमुना | सुधाकर लाड यांचे मार्गदर्शन

# ज्येष्ठांची रायगड सहल उत्साहात पार

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुका निवृत्त सेवक मंडळ आणि पनवेल ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानी किल्ले रायगड येथे ज्येष्ठांची सहल उत्साहात पार पडली. या सहलीचे खास आकर्षण म्हणजे इतिहास संशोधक व लेखक सुधाकर लाड यांनी मार्गदर्शन केले.

७० ते ९० वयोगटातील ज्येष्ठांनी प्रबळ इच्छाशक्ती आणि जिद्दीच्या जोरावर रायगडाची चढण सहज पार केली. अवघड चढ-उतार, पायऱ्यांची दमछाक आणि शारीरिक थकवा यांना न जुमानता ज्येष्ठांनी



छत्रपतींच्या इतिहासातून प्रेरणा घेत प्रवास अधिक आनंददायी केला.

सहलदरम्यान किल्ल्यावरील सिंहासन जागा, राजवाडा, हिरकणी बुरुज, मेघडंबरी, गंगासागर तलाव, नगारखाना, राण्यांचे महाल, जगदीश्वर मंदिर, शिवसमाधी, वाघ्या कुत्र्याची समाधी यांसारख्या ऐतिहासिक वास्तू पाहताना ज्येष्ठांचा उत्साह दुणावला. सुधाकर लाड यांनी त्यांच्या प्रभावी कथनातून रायगडचा भूतकाळ जिवंत करून दाखवला.

सहलीदरम्यान बी.पी. म्हात्रे, दत्तात्रय जाधव, काशिनाथ जाधव आणि मकु यांनी विशेष योगदान दिले. बसमधे मकु, वसुधा, नवाळे, सुलोचना कल्याणकर आदी ज्येष्ठांनी गीत-संगीत, कविता यांमुळे वातावरण रंगतदार केले. खाद्यपदार्थांची रेलचेल आणि आनंदी गप्पांमुळे प्रवास अधिक रंगला.

ज्येष्ठांनी यावेळी रायगड रोप-वेचा थरारक अनुभवही घेतला. सकाळी सहा वाजता निघालेली सहल रात्री दहाच्या सुमारास संपली. सर्व ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर समाधान आणि इतिहासाशी झालेल्या साक्षात्काराचा वेगळाच आनंद दिसत होता.


## DASHMESH HONDA

AUTHORISED DEALER OF HONDA TWO WHEELERS AT ALIBAUG SINCE 2015

**WE ARE LOOKING FOR THE FOLLOWING MANPOWERS FOR OUR ALIBAUG BRANCH**

| SR.NO | DETAILS OF POSTS | NO OF VACANCY | REQUIRED EXPERIENCE |
|---|---|---|---|
| 1 | HR EXECUTIVE | 1 NO | 2 YEARS EXPERIENCE |
| 2 | ACCOUNTS EXECUTIVES | 4 NOS | 3-4 YEARS EXPERIENCE WITH TALLY KNOWLEDGE |
| 3 | IT EXECUTIVE | 4 NOS | 3 YEARS |
| 4 | SALES EXECUTIVES | 10 NOS | 2 YEARS IN ANY SALES |
| 5 | MECHANICS | 10 NOS | 2 YEARS EXPERIENCE IN TWO WEELER REPAIRING |

INTERESTED CANDIDATES CAN APPLY ON MAIL : hrm@simranmotors.com

CONTACT : MR.NAVI JHA - 9223161515
MR.RAMESH PILLAI - 8433958585

# किती मूर्खात काढाल?

काही महिन्यांपूर्वी माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या मुलाची एक भानगड समोर आली होती. ऋषीराज या त्यांच्या मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार तानाजी यांच्या घरच्यांनी दिली. प्रत्यक्षात हे चिरंजीव भाड्याने टॅक्सी करतात तसे भाड्याचे विमान घेऊन थायलंडला निघाले होते. मग तानाजी यांनी फोनाफोनी करून हे विमान आकाशातूनच माघारी पुण्याला वळवले. या विमानाचे भाडे सुमारे ७० कोटी रुपये होते असे सांगतात. थायलंडला आपण एका व्यवहाराची बोलणी करायला चाललो होतो असे ऋषीराजने पोलिसांना सांगितले. ७० कोटी रुपयांचे विमान घेऊन निघाला म्हणजे हा व्यवहारही काहीशे कोटी रुपयांचा नक्की असेल. गंमत अशी की, तानाजीमहोदयांना याची काहीच कल्पना नव्हती. हे तानाजी सावंत धाराशीव जिल्ह्यातले आहेत. तिथे सामान्य गरीब कुटुंबातील अनेक मुले पैशांअभावी शाळा सोडून देत असतील किंवा मजुरीला जात असतील. आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सावंताच्या घरी मुलाचे शेकडो कोटींचे व्यवहार बापाला ठाऊक नाहीत अशी अवस्था आहे. हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे अजित पवार यांनी आपला मुलगा पार्थ याच्या भानगडीबाबत केलेला खुलासा. पार्थची कंपनी अमिडिया ही पुण्यातील एक ४० एकर जमीन बेकायदेशीरपणे खरेदी करायच्या खटपटीत होती. ही जमीन ३०० कोटी रुपयांची होती. हा व्यवहार झाला तरी पार्थचे वडील अजितदादा यांना म्हणे, त्याचा पत्ताच नव्हता. निदान अजितदादा तरी तसा दावा करीत आहेत. इतकेच नाही तर गेले दोन दिवस सगळ्या महाराष्ट्रात यामुळे काहूर माजले आहे, विरोधक दादांच्या राजीनाम्याची मागणी करीत आहेत पण दादांना अजूनही पार्थशी बोलायला वेळ झालेला नाही. हा घोटाळा उघडकीस आला गुरुवारी. आणि रविवारी पत्रकारांशी बोलताना दादा म्हणाले की, मी अजूनही पार्थशी बोललेलो नाही. मधल्या काळात ते या प्रकरणाबाबत मुख्यमंत्र्यांना दोनदा भेटले. अनेकदा पत्रकारांशी बोलले. पक्षाच्या इतर कार्यक्रमांनाही त्यांनी हजेरी लावली. पण सतत बिझी असल्याने दादा पार्थला भेटू किंवा बोलू शकलेले नाहीत. दादा हे सांगतात आणि सर्वांनी त्यावर विश्वास ठेवावा अशी अपेक्षा करतात.

### भोळे पार्थ, भाबडे दादा!

दादांसारखे राजकारणी जनतेला मूर्ख समजतात हे तर वेळोवेळी दिसतेच. लोकसभेतल्या पानिपतानंतर दादा आणि त्यांचे भाईबंद ज्या रीतीने विधानसभेला विजयी झाले त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास आणखीनच वाढलेला दिसतो. त्यामुळेच आपण पार्थला दोन दिवसात भेटलो नाही असे सांगावे आणि जनतेने त्यावर भोळेपणाने विश्वास ठेवावा असे त्यांना वाटते. अमिडिया या कंपनीत पार्थ पवार यांची भागीदारी ९९ टक्के आहे. त्यांच्या कंपनीचे भागभांडवल एक लाख रुपये आणि गेल्या पाच वर्षात इतर व्यवहार शून्य आहे. तरीही ही कंपनी एक जमीन ३०० कोटी रुपयांना विकत घेण्याचा प्रयत्न करते हाच प्रकार अजब आहे. ही भानगड बाहेर आल्यानंतर अमिडियाचे दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल होतो पण पार्थ यांचे नाव मात्र त्यातून वगळले जाते. यावर गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस सफाई अशी देतात की खरेदीखतावर पाटील यांची सही असल्याने केवळ त्यांच्यावरच गुन्हा दाखल झाला आहे. पाटील यांनी वैयक्तिक खरेदीसाठी नव्हे तर अमिडिया कंपनीच्या वतीने हा करार केला होता. असे असूनही पार्थ यांना धक्का न लावण्याचे फडणवीस यांचे तर्कशास्त्र चमत्कारिक आहे. लोकांना मूर्ख समजण्याचे वा मूर्खात काढण्याचे हे धंदे अजितदादा, फडणवीस आणि शिंदे यांनी बंद करायला हवेत. या व्यवहारात एक रुपयाही दिला गेलेला नाही, सबब यात काही गुन्हा घडलाच नाही असा दावा अजितदादा आता करीत आहेत. तसेच या खरेदीखताची नोंदणी करणाऱ्या उपनिबंधकावर आणि तहसिलदारावर ते सर्व दोष ढकलू पाहत आहेत. प्रश्न हाच आहे की, ३०० कोटी सोडा ३० हजाराच्या एखाद्या व्यवहाराची प्रत्यक्ष पैसे दिल्याच्या पावतीखेरीज नोंद करायला सामान्य माणूस गेला तर त्याला सरकारी कर्मचारी दारातूनच हाकलून देतील. इथे मात्र या लोकांना पायघड्या घातल्या गेल्या. इतकेच नाही तर, तथाकथित खरेदीखत झाल्यावर ही जमीन खाली करून देण्यासाठी तहसिलदारांनी बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला अधिकृत पत्र लिहिले. हे सर्व पार्थच्या भोळेपणामुळे घडले व बिचाऱ्या अजितदादांना यातले काहीही ठाऊक नव्हते यावर तुम्हीआम्ही तितक्याच भोळेपणाने विश्वास ठेवावा असे भाबड्या अजितदादांना वाटते.

### कोणाला वाचवता आहात?

ही जमीन महारवतनाची म्हणजेच वर्ग दोनची होती. ती जमीन सरकारी परवानगीखेरीज विकली जाऊ शकत नाही हे अडाणी माणसांनाही ठाऊक असते. ते पार्थसारख्यांना ठाऊक नव्हते हेच अशक्य आहे. तरीही हा व्यवहार रेटण्याचा प्रयत्न झाला याचा अर्थ अशाच प्रकारे इतरत्रही काही व्यवहार झाले असले पाहिजेत. किंवा सत्ता आपलीच असल्याने आपण वाटेल तसे नियम वाकवू शकतो असा माज पार्थ व त्याच्या सहकाऱ्यांना असला पाहिजे. साधारणपणे सरकारी कर्मचारी इतक्या पातळीवर जाऊन बेकायदा व्यवहार करताना दहा वेळा विचार करतात. पण यामध्ये पार्थ असल्याने आपल्याला कोणीही हात लावू शकणार नाही असा या कर्मचाऱ्यांना भरवसा असावा वा तशी खात्री त्यांना दिली गेली असावी. अजितदादा आता सरकारी अधिकाऱ्यांनी हा बेकायदा व्यवहार केलाच कसा असा प्रश्न करत आहेत. त्यांना हे सर्व जणू ठाऊकच नाही. मला ठाऊक असते तर आपण हा व्यवहार होऊच दिला नसता असेही दादा म्हणतात. आपला सख्खा मुलगा, आपल्या पालकमंत्रिपदाच्या अखत्यारीतील पुणे जिल्ह्यात असा एक बेकायदा व्यवहार करीत आहे हे दादांना इतके दिवसात कळले नसेल तर त्यांनी या एका गोष्टीसाठी राजीनामा द्यायला हवा. ही जमीन बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला लीजवर दिली गेलेली आहे. ती खाली करावी म्हणून तहसिलदार येवले यांनी त्या संस्थेला रीतसर पत्र पाठवले. त्यावर संस्थेने जिल्हाधिकारी दुडी यांना तसे कळवले. त्यावर दुडी यांनी या व्यवहाराची तपासणी करून संस्थेला जमीन जाणार नाही असे आश्वस्त केले होते. हे सर्व दादांच्या परभारे व त्यांना न कळवता चालू असेल तर दादांनीच नव्हे तर महायुती सरकारनेही राजीनामा द्यायला हवा. विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या नसलेल्या भानगडी उकरून काढून त्यांच्यावर इडी वा पोलिसांच्या धाडी घातल्या जातात. इथे मात्र पार्थ व त्याचे वडील अजितदादा यांचा थेट संबंध असूनही त्या दोघांना वाचवले जात आहे. फडणवीस आणि त्यांचा भाजप हे अजितदादांच्या राष्ट्रवादीला कसे खेळवत आहेत असे म्हणून भाजपचे भक्त कदाचित यातून आपल्या मनाची करमणूक करून घेऊ शकतील. पण सामान्य जनता मात्र आम्हाला किती मूर्खात काढाल असाच प्रश्न करील व दादांच्या राजीनाम्याची मागणी करील.

विचार

# अजेंटिक एआयची वेधक वाट

***अजेंटिक एआय ही कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली स्वत: विचार करून कृती करू शकते. त्यामुळे डिजिटल सहकार्याचे रूप बदलू शकते. स्मार्ट म्हणजे मानवी उत्पादकता वाढवणाऱ्या प्रणाली आणि उत्पादने. एजेंटिक ही त्यापुढील पायरी विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वायत्तपणे कार्य करू शकते, निर्णय घेऊ शकते आणि मर्यादित मानवी देखरेखीसह कृती करू शकते. हे पारंपारिक एआयच्या पलीकडील पाऊल आहे.***




**डॉ. दीपक शिकारपूर**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील झेप नजीकच्या काळात अनेक क्षेत्रांवर आपला प्रभाव दाखवायला सुरुवात करेल. अनेक क्षेत्रे या तंत्रज्ञानामुळे आमूलाग्र बदलतील. गेल्या काही वर्षांमध्ये जेन आय टूल्स(उदा जेमिनी, चॅटजीपीटी)चा वापर वाढला. झटपट ज्ञानप्राप्तीसाठी अनेक विद्यार्थी आज त्यांचा वापर करतात. त्यामुळे माहितीची (अगदी चित्र, ध्वनी, विडिओसकट) निर्मिती करणे सुलभ व सुपरफास्ट झाले. आता पुढचा टप्पा गाठायची वेळ आली आहे. त्यासाठी अजेंटिक एआय समजून घेणे महत्वाचे आहे. अजेंटिक एआय केवळ ‘स्मार्ट’ नाही, तर ‘स्वायत्त’ आहे. म्हणजेच, हे एआय स्वतः विचार करून कृती करू शकते. त्यामुळे डिजिटल सहकार्याचे रूप बदलू शकते. स्मार्ट म्हणजे मानवी उत्पादकता वाढवणाऱ्या प्रणाली आणि उत्पादने. अजेंटिक ही त्याच्या पुढची पायरी आहे. अजेंटिक एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली, जी विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वायत्तपणे कार्य करू शकते, निर्णय घेऊ शकते आणि मर्यादित मानवी देखरेखीसह कृती करू शकते. हे पारंपारिक एआयच्या पलीकडे जाणारे एक पाऊल आहे. अजेंटिक एआय सिस्टीममध्ये अनुभवातून शिकण्याची, गतिमान वातावरणाशी जुळवून घेण्याची आणि जटिल उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतर एआय सिस्टीमशी सहयोग करण्याची क्षमता अशी अनेक वैशिष्ट्ये आहेत. हे थोडेफार मानवी मेंदूसारखे आहे. यामुळे एआय अधिक प्रभावीपणे मानवासारखा विचार आणि सहयोग करू शकते.

अजेंटिक एआय एजंट म्हणजे अशी एआय प्रणाली, जी आपल्या माहितीजालातून माहिती गोळा करते, स्वतः शिकलेल्या अनुभवांवर आधारित तर्क करते आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय बहु-टप्प्यांची कार्ये पूर्ण करते. हे एजंट्स जटिल समस्यांना लहान उप-कार्यांमध्ये विभागतात, साधने वापरतात आणि अंतिम ध्येय गाठेपर्यंत सतत स्वतःच्या कृतींचे मूल्यांकन करतात. थोडक्यात, हे एजंट्स जनरेटिव्ह एआयच्या निर्मितीक्षमतेचा वापर करून, त्याला कार्यान्वित करणारी एक निर्णायक शक्ती प्रदान करतात. यात मानवी हस्तक्षेप मर्यादित असतो. पारंपारिक एआयच्या तुलनेत अधिक कार्यक्षम असणारी एजंटिक एआय स्वतंत्रपणे काम करू शकते. ही यंत्रणा अनुकूलता पूर्व-परिभाषित नियमांचे पालन करत अनुभवातून शिकते आणि बदलांशी जुळवून घेते. स्वतंत्र निर्णय घेऊ शकते. गुंतागुंतीची तसेच सोपी कामे आणि कार्यप्रवाह हाताळते. जटिल, बहु-चरणीय कार्ये हाताळते. अजेंटिक एआयचा उद्योगक्षेत्रात मोठा प्रभाव पडत आहे. भविष्यात हा प्रभाव अधिक वाढणार आहे. याचा वापर करून उद्योग अधिक कार्यक्षम, उत्पादक आणि स्पर्धात्मक बनू शकतात. शिक्षणक्षेत्रात हे तंत्र महत्वाची कामगिरी बजावू शकते. शिक्षक एआयकडे एक सहयोगी म्हणून पाहतील. सध्या पारंपरिक शिक्षणव्यवस्थेमध्ये शिक्षकांना अनेकदा अशैक्षणिक (कारकुनी) काम मोठ्या प्रमाणावर करावे लागते. हे काम अजेंटिक एआय करु शकते. त्यामुळे शिक्षकांची शैक्षणिक उत्पादकता अनेक पटींनी वाढेल.

अजेंटिक एआय विशेषतः विज्ञान आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये व्हर्च्युअल लॅब्ज आणि इमर्सिव्ह लर्निंग वातावरणाची निर्मिती करेल. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासारखे शिक्षण मिळेल. अनेकदा प्रात्यक्षिकांसाठी उद्योगांमध्ये प्रत्यक्ष भेट आवश्यक ठरते. आता त्याची गरज राहणार नाही. आपल्या संगणकावर आणि पडद्यावर आपण उन्नत अनुभव घेऊ शकू. एआय-आधारित मूल्यांकन प्रणाली अधिक अचूक, जलद आणि वैयक्तिकृत अभिप्राय देतील. परीक्षा पद्धतींमध्ये बदल करून विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कौशल्यांचे मूल्यांकन करण्यावर भर दिला जाईल; केवळ स्मरणशक्तीवर भिस्त राहणार नाही. ही पध्दत सरावासाठी मागील काही वर्षांच्या प्रश्नपत्रिकेचे पृथ:करण करून विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रश्न आणि नंतर अचूक उत्तरे सांगू शकते. त्यामुळे विद्यार्थी परीक्षेसाठी अधिक चांगल्या प्रकारे सज्ज होतील तसेच आपल्या उत्तरांचे पृथःकरण करून कुठे जास्त अभ्यासाची गरज आहे हे समजून घेतील. पारंपरिक गाईड्सना याचा मोठा धोका आहे. कसा अभ्यास करून जास्त गुण मिळवता येऊ शकतील याचे मार्गदर्शन अजेंटिक एआय विद्यार्थी आणि शिक्षकांना देईल. याचा मोठा फायदा ग्रामीण आणि निमशहरी भागातील शैक्षणिक संस्थांना होईल कारण अशा ठिकाणी चांगले शिक्षक मिळणे अवघड असते.

अजेंटिक एआय एजंट या नव्या पिढीतील स्वायत्त प्रोग्रॅममुळे कार्यप्रणाली अधिक स्मार्ट, वेगवान आणि व्यक्तिगत बनली आहे. अजेंटिक एआय एजंट वैयक्तिक डिजिटल शिक्षणात विद्यार्थ्यांसाठी हवे तसे मार्गदर्शन करून देतील. हे एजंट विद्यार्थ्यांची क्षमता आणि कमतरता ओळखून शिकण्याचा रास्त मार्ग निवडतात. शिक्षकांना वेळ वाचवण्यासाठी हे एजंट्स परीक्षा तपासणी, उपस्थिती मापन, गृहपाठ मदत व निकालवर्धन असे फायदे देतात. विज्ञान व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये व्हर्च्युअल लॅब्ज, इमर्सिव्ह लर्निंग अनुभव देत ग्रामीण आणि निमशहरी संस्थांसाठी शिक्षणाची दारे खुली करतात. साधनसंपत्तींची कमतरता असलेल्या शाळा तसेच महाविद्यालयांसाठी हे फारच उपयुक्त आहे. शिकण्याचे नवे क्षितिज खुले होत असताना डेटाची गोपनीयता आणि तंत्रज्ञानाचा समावेश ग्रामीण भागात वाढवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अजेंटिक एआय टूल्स केवळ प्रयोगशाळांपुरती मर्यादित नाहीत. अशी टूल्स आता व्यवसाय आणि शिक्षणक्षेत्रात प्रत्यक्षात वापरली जात आहेत एकंदरीत, अजेंटिक एआयमुळे भारतातील उद्योग आणि शिक्षणक्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होतील. उत्पादकतेत वाढ, नवीन नोकऱ्यांची निर्मिती आणि शिक्षणात क्रांती घडवून आणण्याची क्षमता यात आहे. मात्र, यासोबतच कौशल्य अंतर, डेटा गोपनीयता आणि नैतिक वापर यांसारख्या आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे; जेणेकरून भारताला या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त फायदा घेता येईल.

भविष्यात, हे एजंट्स अधिक चतुर आणि संवादात्मक बनतील. एजंटिक एआय एजंट्स केवळ प्रश्नांची उत्तरे देणार नाहीत, तर आपल्या वतीने प्रॉक्सी (प्रतिनिधी) म्हणून काम करतील. ते आपल्या आवडीनिवडी शिकून आपल्यासाठी स्वायत्तपणे व्यवहार करतील. आपल्या कॅलेंडरनुसार मीटिंग्ज सेट करतील आणि कामाच्या प्राधान्यांनुसार ईमेलला प्रतिसाद देतील. आपला डिजिटल मदतनीस (एक्झिक्युटीव्ह असिस्टंट) म्हणूनही ते दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनतील. एजंटिक एआय एजंट्स एआयच्या तिसऱ्या लाटेचे प्रतिनिधित्व करतात, जिथे कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ एक साधन न राहता, एक स्वायत्त भागीदार बनते. येत्या काही वर्षांमध्ये हे एजंट्स उद्योगांची कार्यक्षमता वाढवून आणि मानवी कामाचे स्वरूप बदलून, आपल्या जीवन आणि कार्यशैलीत मोठे परिवर्तन घडवून आणतील. हे तंत्रज्ञान आपल्याला अधिक सर्जनशील आणि उच्च-मूल्याच्या कार्यांवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करेल, ज्यामुळे मानवी उत्पादकता एका नवीन शिखरावर पोहोचेल. ‘एआय २०३० इंडिया’ उपक्रम ही सरकार-समर्थित योजना आहे. भारताला २०३० पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये जागतिक नेता म्हणून स्थान देणे हा याचा उद्देश आहे. नैतिक अंमलबजावणी आणि सामाजिक प्रभावावर जोरदार भर देऊन भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक आणि जबाबदार एआय अवलंब करण्यावर लक्ष केंद्रित करणे, हे या तंत्राचे ध्येय मानले गेले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, प्रमुख वैज्ञानिक सल्लागार कार्यालय, नॅसकॉम आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे सेंटर फॉर द फोर्थ इंडस्ट्रियल रिव्होल्यूशन इंडिया याचे नेतृत्व करत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे एकविसाव्या शतकातील सर्वात प्रभावी तंत्रज्ञान आहे आणि भारताने याचा उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्याचा निर्धार केला आहे. ‘एआय फॉर इंडिया २०३०’ धोरण भारताच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**deepak@deepakshikarpur.com**

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

# चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न

**प्रमोद जाधव**

अलिबाग - पेण मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहे. शनिवार व रविवारी सुट्टीच्या दिवशी तासतास रस्त्यातच अडकण्याची वेळ प्रवाशांवर येते हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेने एक वेगळा उपक्रम हाती घेतला आहे. ओव्हरटेक करणाऱ्यांवर आता सीसीटीव्ही कॅमेरातून लक्ष ठेवले जाणार आहे. वडखळ ते अलिबाग मार्गावर ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहे. ओव्हरटेक करताना आता सावधान बाळगण्याची वेळ चालकांवर येणार आहे. त्यामुळे चालकांनी आता रस्त्यावरून ओव्हरटेक करताना सावधानता बाळगणे गरजेचे आहे. चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.


अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. जिल्हा सरकारी कार्यालयांसह वेगवेगळ्या शाळा, महाविद्यालये आहेत. खासगी संस्था आहेत. नोकरी व्यवसायाबरोबरच शिक्षणासाठी अलिबागला येणाऱ्यांची संख्या प्रचंड झाली आहे. अलिबागहून पुणे, मुंबई बोरीवली, ठाणे, कल्याण, शिर्डी, अहिल्यानगर, संभाजी नगर अशा अनेक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. वाहनांची संख्या प्रचंड वाढली असताना अरुंद रस्त्यांचा फटका अलिबाग-पेण मार्गावरील प्रवाशांना कायमच बसत आहे. सुट्टीच्या दिवशी अलिबागमध्ये येणाऱ्यांची संख्या वाढल्याने वाहनांची वर्दळही वाढली आहे. शनिवार व रविवारी सुट्टीच्या दिवशी अलिबाग पेण मार्गावर मोठी गर्दी होते. वाहनांच्या रांगाच रांगा असतात. काही वाहन चालक बेशिस्तपणे वाहन चालवून ओव्हरटेक करतात.त्यामुळे अनेक वेळा वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होतो. वाहतूक कोंडीमुळे या मार्गावरील प्रवासी त्रस्त झाले आहेत. कोंडी सोडविताना, वाहतूक पोलिसांची पुर्णतः दमछाक होते. तासनतास उभे राहून बेशिस्त चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला जातो. तरीदेखील काही महाभाग चालक वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहन चालवितात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. वडखळ-अलिबाग रस्त्यावर वारंवार वाहतुक कोंडीचा प्रश्न भेडसावत आहे. अरुंद व खड्डेमय रस्ते, अवजड वाहनांची रस्त्यावर असलेली बेकायदेशीर वाहतूक अशा अनेक प्रकारामुळे रस्त्यांवरून वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

वाहतूक कोंडीचा हा प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी एक नवीन उपक्रम हाती घेतला आहे. अलिबाग- पेण मार्गावरून वाहतूक करणाऱ्या चालकांनी विनाकारण ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरांची मदत घेतली जाणार आहे. सीसीटीव्ही कॅमेराच्या माध्यमातून ओव्हरटेक करणाऱ्या वाहन चालकांवर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी वाहन चालविताना आता सावधानता बाळगणे गरजेचे आहे. लवकरच या मार्गावर सीसीटीव्ही मार्फत चालकांवर लक्ष ठेवले जाणार आहे. तसेच वाहतूक सुट्टीच्या दिवशी वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांसह स्थानिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी एक नवीन उपक्रम हाती घेतला आहे.

परतीच्या मार्गावर असताना एकाच वेळी पर्यटक निघतात. त्यामुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी होते. जिल्ह्यातील रेस्टॉरन्ट, हॉटेल, कॉटेज चालक, मालकांची बैठक घेऊन त्यांना पर्यटकांना सोडताना एक तासाचे अंतर ठेवण्याच्या सुचना केल्या आहेत. तसेच हॉटेल, चालक मालकांना पत्रक देऊन त्यातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी हा नविन उपक्रम राबविला जाणार आहे. वेगवेगळ्या हॉटेल, कॉटेजच्या मालक, चालकांकडून सुचना मागवून त्यांच्यासोबत बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अलिबाग- पेण मार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या शिस्तीमुळे अलिबाग-पेण मार्गावरील प्रवास सुकर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अलिबाग, कर्ज, पेणमध्ये नागरिकीकरण झपाट्याने वाढत आहे. शहरांमध्ये वाहतूक कोंडीसह वाहन पार्कींगचा प्रश्न कायमच भेडसावत आहे. त्यामुळे कर्जत, पेण, अलिबाग या शहरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्या माध्यमातून चालकांवर ई चलन कारवाई केली जाणार आहे. अलिबागचे काम अंतिम टप्प्यात आहे. तपासणीचे काम सुरू आहे. त्यामुळे हे काम लवकरच पुर्ण होईल. मात्र पेण व कर्जतचे काम सुरु करण्याची हालचाल आहे. त्याठिकाणीदेखील सीसीटीव्ही कॅमेरे बसवून बेशिस्त चालकांविरोधात ऑनलाईन चलनामार्फत कारवाई केली जाईल, अशी माहिती जिल्हा वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी दिली.

लोकसंसद

## ‘डीएनए’च्या दुहेरी सर्पिल संरचनेचा संशोधक हरपला



‘डीएनए’च्या दुहेरी सर्पिल संरचनेच्या (डबल हेलिक्स संरचना) संशोधनांमुळे २० व्या शतकातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ म्हणून ज्यांची ओळख आहे, ते अमेरिकन अनुवंशशास्त्रज्ञ जेम्स वॉटसन यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. १९५३ मध्ये जेम्स वॉटसन आणि ब्रिटिश आण्विक जीवशास्त्रज्ञ फ्रांसिस क्रिक यांनी डीएनएची डबल हेलिक्स संरचना सादर केली. त्यावेळी जेम्स वॉटसन यांचे वय अवघे २४ वर्षे होते. या संशोधनाबद्धल त्यांना १९६२ मध्ये नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले. खरे तर डीएनएचा (डीऑक्सिरायबोन्यूक्लिक ॲसिड) शोध १८६९ मध्ये स्वित्झर्लंडचे जीव रसायनशास्त्रज्ञ फ्रेडरिक मिशर यांनी लावला होता. मात्र त्याची संरचना आणि कार्य जेम्स वॉटसन आणि फ्रांसिस क्रिक यांच्या संशोधनातून समोर आले. या शोधामुळे आण्विक जीवशास्त्राच्या क्षेत्रात क्रांती घडून आली. सांप्रत काळात वैद्यकशास्त्र, गुन्हे अन्वेषण, वंश ओळख, पुरातत्वीय जैविक अवशेष ओळख व इतर अनेक क्षेत्रात डीएनए चाचणीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. उतारवयात जेम्स वॉटसन यांनी कृष्णवर्णीय लोकांवर बुद्धिमत्तेच्या संदर्भात केलेल्या आक्षेपार्ह विधानांमुळे अनेक दशके वैज्ञानिक जगात आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून असलेल्या त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचला आणि त्यांची कारकीर्द काहीशी काळवंडली.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# राष्ट्रीय शिक्षण दिन

११ नोव्हेंबर हा दिवस भारतात राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांना समर्पित आहे. देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचा ११ नोव्हेंबर हा जयंती दिन आहे. आझाद हे स्वातंत्र्यसैनिक आणि भारताचे पहिले शिक्षण मंत्री (१९४७ ते १९५८) होते. आझाद यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान दिले होते. राष्ट्रीय शिक्षक दिन साजरा करण्याचा सर्वात मोठा उद्देश म्हणजे लोकांना शिक्षणाचा अधिकार आणि शिक्षणाचे महत्त्व याची जाणीव करून देणे. दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. या दिवशी विद्यार्थी आणि शिक्षक साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाच्या विविध पैलूंबद्दल त्यांचे विचार मांडतात. अनेक प्रकारचे सेमिनार आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

शिक्षण हा प्रत्येकाचा वारसा आहे जो देशातील प्रत्येक व्यक्तीला जीवनात मोठी उंची देतो. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाचा विकास शक्य नाही आणि देशाची अर्थव्यवस्थाही प्रगती करू शकत नाही. देशातील प्रत्येक वर्गाला शिक्षण देण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि जागरूक करण्यासाठी भारत दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करतो. महान व्यक्तिमत्व मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त शिक्षणाचा हा विशेष दिवस साजरा केला जातो. ज्या महान व्यक्तीच्या नावाने येथे राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा केला जातो त्यांचे नाव मौलाना अबुल कलाम आझाद आहे, ज्यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी सौदी अरेबियाच्या मक्का शहरात झाला होता. यानंतर मौलाना आझाद यांनी इजिप्तमधील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था जामिया अझहरमध्ये प्रवेश घेतला. मौलाना अनेक भाषांचे जाणकार होते आणि त्यांना उर्दू, पर्शियन, हिंदी, अरबी आणि इंग्रजी भाषा येत होत्या. मौलाना आझाद यांनी सौदी अरेबिया सोडून भारतात आश्रय घेण्याचा निर्णय घेतला होता, ते भारतात आल्यावर ते कलकत्त्यात राहू लागले. कलकत्त्यामध्ये राहून त्यांनी पत्रकारिता आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रांत आपले पाय रोवले. येथे राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करण्याबद्दल बोलताना, शिक्षणाच्या या विशेष प्रसंगी मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या आजवरच्या योगदानाचे स्मरण केले जाते. शैक्षणिक क्षेत्रात अनेक महत्त्वाच्या गोष्टींची चर्चा होते. या दिवशी भारतीय शिक्षण व्यवस्थेचा इतिहास आणि सध्याच्या गरजा याविषयी अत्यंत गंभीर गोष्टींवर चर्चा केली जाते. शिक्षक दिनाप्रमाणे हा दिवसही शाळा आणि महाविद्यालयांमध्ये खास पद्धतीने साजरा केला जातो. या दिवशी शिक्षक आणि विद्यार्थी शिक्षणाच्या मूलभूत विषयांवर बोलतात आणि शिक्षणाचा प्रचार करतात. फारसा गाजावाजा न करता कार्य करीत राहणे हे त्यांचे वैशिष्ठ्य होते. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्रप्रसाद, ॲनी बेझंट, लाल बहादूर शास्त्री, विठ्ठलभाई पटेल यांच्यासमवेत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी उडी घेतली. भारत हा आपला देश आहे, त्यावर परकियांचा ताबा ही दडपशाही आहे, अशी त्यांची भूमिका होती. भारतावर स्वकियांचीच सत्ता हवी असे त्यांचे मत होते. कष्ट आणि निष्ठा यावर मौलानांची नितांत श्रद्धा होती व शेवटपर्यंत त्यांनी या विचारांवरच वाटचाल केली.

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पं. जवाहरलाल नेहरूंनी मौलानांकडे शिक्षण मंत्रालयाचे काम सोपवले व ते स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री झाले. त्यांनी त्या काळी अत्यंत बिकट परिस्थितीतही भारतात शिक्षणाचा प्रसार व प्रचार उत्तम प्रकारे केला. त्यांना युरोपच्या तत्कालीन समस्यांचे चांगले ज्ञान होते. तसेच त्यांना युरोपियन साहित्याचेही चांगले ज्ञान होते. महाकवी बायरन आणि फ्रान्सच्या कादंबरीकारांची त्यांना चांगली माहिती होती. अशा या व्यासंगी शिक्षणमंत्र्यांचे २२ फेब्रुवारी १९५७ रोजी निधन झाले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

११ नोव्हेंबर

१) श्री. रमाकांत हरिश्चंद्र राऊत
मु.नवेदर, अलिबाग,
११-११-१९४९

२)श्री.मधुकर गणपत मंचेकर
मु.वेश्वी, अलिबाग
११-११-१९५२

## घरफोडी करणाऱ्या आरोपीला अटक

**ठाणे :** मिरा-भाईंदरमध्ये घरफोडी करणाऱ्या आरोपीला नवघर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून सव्वा दोन लाखांचे सोन्याचे दागिने आणि तीन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीतील न्यु आराधना इस्टेट, नवघर रोड येथे असलेल्या कंपनीतून तक्रारदार छोटेलाल महातो (३६) यांचे गाळ्याचे शटर कोणीतरी अज्ञात इसमाने उचकटून गाळ्यात ठेवलेल्या बॅगमध्ये असलेले ४ लाख ३२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, मोबाईल फोन तसेच रोख रक्कम घरफोडी चोरी करुन चोरुन नेली होती.

# अनधिकृत झोपड्या जमीनदोस्त

## • काशिगाव येथे महापालिकेची तोडक कारवाई

**| ठाणे | प्रतिनिधी |**

**काशिगाव येथील काशी येथील आरक्षण क्रमांक ३२० या जागेत भूमाफियांनी अनधिकृत झोपड्या बांधल्या आहेत. याबाबत अनेक तक्रारी करून देखील महापालिकेकडून कारवाई करण्यात येत नव्हती. त्यामुळे त्याठिकाणी १०० पेक्षा जास्त झोपड्या बांधण्यात आल्या होत्या. या अनधिकृत झोपड्यांवर महापालिका प्रभाग क्रमांक ४ यांनी तोडक कारवाई करून ५० झोपड्या तोडत कारवाई केली आहे.**



या बेकायदा झोपड्यांमुळे मूळ लाभार्थ्यांना सोयी सुविधांपासून वंचित राहावे लागत होते. मिरा-भाईंदर महापालिकेचे शहरात अनेक ठिकाणी आरक्षित भूखंड आहेत. यातील काही भूखंड महापालिकेने ताब्यात घेतले आहेत. तर काही भूखंड ताब्यात घेणे बाकी आहे. महापालिकेने आरक्षित भूखंडावर फलक लावणे आवश्यक आहे. फलक लावलेले नसल्यामुळे काही आरक्षित जागांवर भूमाफिया हे अनधिकृत झोपड्या बनवून विकत आहेत. यामध्ये गरीब नागरिकांची फसवणूक केली जात आहे. याबाबत तक्रारी केल्या तरी देखील कारवाई केली जात नसल्याने महापालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते.

काशीगाव पोलीस ठाण्याच्या बाजूलाच महापालिकेचे आरक्षण क्र.३२० आहे. या जागेचा टीडीआर जागा मालकाला दिल्यानंतर महापालिकेने ती जागा ताब्यात घेतली. या जागेवर महापालिकेने बीएसयूपी योजनेतील लाभार्थ्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपातील संक्रमण शिबिरातील रहिवाशांसाठी १८० फायबर सीट्सच्या खोल्या बांधल्या. तर उर्वरित जागा महापालिकेने खाली ठेवली होती. याचा गैरफायदा घेत स्थानिक भूमाफियांनी त्या जागेवर अनधिकृत झोपड्या बांधण्यास सुरूवात केली. त्यावेळी महापालिकेने कारवाई केली नाही. त्याचाच फायदा घेत त्यानंतर १०० पेक्षा जास्त झोपड्या बांधण्यात आल्या. या झोपड्या बीएसयूपी योजनेतील मूळ लाभार्थी असल्याचे दाखवण्यात आले. अनेक तक्रारदारांनी प्रभाग अधिकाऱ्यांकडे अनेकदा तक्रारी केल्या होत्या. परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

### दहा लाखांना विक्री

भूमाफियांकडून महापालिकेच्या आरक्षित जागेत १०५ खोल्या बांधल्या. त्यातील काही खोल्या ४ हजार रुपये महिना भाड्याने देण्यात आल्या होत्या, तर काही खोल्या गरीब आणि गरजूंना सुमारे ९ ते १० लाख रुपयांना विकण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या झोपड्यांवर कारवाई करण्याबाबत वारंवार तक्रारी केल्यामुळे प्रभाग अधिकारी स्वप्निल सावंत यांच्या नियंत्रणाखालील पथकाने शुक्रवारी त्या अनधिकृत झोपड्यावर तोडक कारवाई करून १०५ झोपड्यांपैकी ५० झोपड्यांवरच कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित झोपड्यांवर देखील कारवाई करण्यात येणार असल्याचे सावंत यांनी सांगितले आहे.

## हातखंबा परिसरात अंधाराचे साम्राज्य

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गावरील हातखंबा तिठ्यावर बसविण्यात आलेले नवे दोन्ही हायमास्ट दिवे गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहेत. परिणामी रात्रीच्या वेळी या परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरते. याचा मोठा फटका वाहनचालक, एसटी प्रवासी तसेच स्थानिक नागरिकांना बसत आहे. तसेच येथे काही अनुचित प्रकारही घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. महामार्गाचे काम या भागात पूर्ण झाले असले तरीही हायमास्ट सुरू करण्याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. सुरुवातीला काही दिवस हे दिवे कार्यान्वित ठेवण्यात आले होते. मात्र त्यानंतर ते अचानक बंद पडले आहेत. हातखंबा परिसरात मागील काही दिवसात तब्बल तीन चोरीच्या घटना घडल्या असून चोरटे अजूनही फरार आहेत. अशा परिस्थितीत चौकातील हायमास्ट बंद असल्याने रात्रीच्या वेळी गुन्हेगारी घटना होण्याची शक्यता नागरिकांकडून वर्तवण्यात येत आहे. तरी प्रशासनाने लवकरात लवकर हे दिवे कार्यान्वित करावे, अशी मागणी स्थानिकांकडून होऊ लागली आहे.

## एक्सप्रेसच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**रत्नागिरी :** रत्नागिरी येथील ३० वर्षीय तरुणाचा राजधानी एक्सप्रेसच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. स्वरुप दयानंद कांबळे असं मृत तरुणाचे नाव आहे. स्वरुप हा रत्नागिरीच्या उमरे कांबळेवाडी गावचा रहिवासी होता. स्वरूप बोटीवर खलाशी म्हणून काम करत होता. याशिवाय प्लंबिंग आणि घरांचे रंगकाम ही कामेही करत असे. स्वरूपच्या मृत्यूमुळे कांबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. स्वरूप हा एकुलता एक मुलगा असलेला कांबळे कुटुंबाचा आधार हरपला आहे.

## मोहिली पुलाची बिकट अवस्था

**| ठाणे | प्रतिनिधी |**



मोहिली, चोची गावांना जोडणाऱ्या उल्हास नदीवर बांधलेल्या पुलाची अतिशय बिकट अवस्था झाली आहे. दगड निखळलेले, गंजलेल्या सळया आणि खचलेला पाया यामुळे लाखो प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हा पूल कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता आहे. सावित्रीसारखी पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी लवकरात लवकर पुलाची दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनचालक तसेच स्थानिकांनी केली आहे.

उल्हास नदीवर बांधण्यात आलेल्या पुलाला ३५ हून अधिक वर्षांचा कालावधी लोटला आहे. पुलावरून रोज हजारो वाहने ये-जा करतात. या पुलाचा पायाच ढासळला आहे. त्यामुळे महाडसारखी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होईल का, असा सवाल नागरिकांनी केला आहे. बीड, मोहिली, मुगपे, चोची यांना जोडणारा हा महत्त्वाचा दुवा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या पुलाची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे हा अवघड वाहनाच्या वाहतुकीमुळे पुलाला हादरे बसत आहेत.

## मुंबईकरांची वाहतूककोंडीतून होणार सुटका

**| मुंबई | प्रतिनिधी |**



दररोजच्या वाहतूक कोंडीने त्रस्त असलेल्या मुंबईकरांची नजिकच्या भविष्यात वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे. शहरात भूमिगत रस्त्यांचे जाळे तयार केले जाणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) प्रस्तावित एकात्मिक भुयारी रस्ता प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

प्रस्तावित उपक्रमांतर्गत मुंबई कोस्टल रोड, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील बुलेट ट्रेन स्थानक आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी-२) यांना जोडणारा भूमिगत कॉरिडॉर उभारण्यात येणार आहे. त्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि एस. व्ही. रोडवरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर भूमिगत मार्गामुळे वाहतुकीवरील दाब कमी होईल. अवजड वाहनांची हालचाल भुयारी रस्त्याद्वारे वळवण्यात येणार असल्याने मुंबईतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार आहे. सुमारे ७० किलोमीटर लांबीचा हा प्रकल्प तीन टप्प्यांत राबवला जाणार आहे. या माध्यमातून रस्ते आणि मेट्रो यांना पूरक एकत्रित वाहतूक नेटवर्क तयार केले जाणार असल्याचे एमएमआरडीएने म्हटले आहे.

## आरोग्य शिबिराचे आयोजन

**रत्नागिरी :** साखरपा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एक्सरेचा कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. शिबिरात ६० वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुष तसेच त्यापेक्षा कमी वय असलेले पण मधुमेह आणि रक्तदाब विकार असलेले तसेच आठ दिवसांपेक्षा जास्त दिवस ताप, खोकला असलेल्या सर्व नागरिकांच्या छातीचे एक्स-रे मोफत काढण्यात येतील. १२ नोव्हेंबरला हे शिबीर दुपारी १ ते ५ या वेळेत होणार आहे. तरी ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले आहे.

## महामार्गावरील खड्डे बुजविण्याच्या कामाला गती

**| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांमुळे त्रस्त झालेल्या कुडाळवासीयांना लवकरच दिलासा मिळणार आहे. वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या आणि अपघातांना निमंत्रण देणाऱ्या हुमरमळा, पणदूर व वेताळ बांबर्डे येथील महामार्गावरील खड्डे बुजविण्याच्या कामाला अखेर गती मिळाली आहे. महामार्ग ठेकेदाराने युद्धपातळीवर हे काम सुरू केले आहे. मागील अनेकवेळा ठेकेदार जागेवर उपस्थित नसल्याने कामे निकृष्ट होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या; मात्र यावेळी संबंधित ठेकेदार स्वतः कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून काम योग्य प्रकारे पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले आहे. ठेकेदाराने दिलेल्या माहितीनुसार, खड्डे बुजवण्यासाठी रस्त्याच्या स्वरुपानुसार योग्य साधनसामग्रीचा वापर केला जात आहे. डांबरीकरण असलेल्या ठिकाणी डांबरी मटेरियल वापरले जाणार आहे, तर काँक्रिट असलेल्या रस्त्यांवर काँक्रिट मटेरियलचा वापर केला जाणार आहे.

### कुडाळवासीयांना मिळणार दिलासा

## पाण्याच्या टाकीत बेपत्ता इसमाचा मृतदेह

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मागील एक आठवड्यापासून बेपत्ता असलेल्या ३५ वर्षीय इसमाचा मृतदेह वडाळा येथील एका इमारतीच्या टाकीत आढळला आहे. वडाळा पूर्वेच्या भक्ती पार्क येथील एमएमआरडीए वसाहतीत रविवारी दुपारी येथील ११ क्रमांकाच्या इमारतीच्या खाली असलेल्या पाण्याच्या टाकीतून रहिवाशांना दुर्गंधी येत होती. त्याची माहिती अग्निशमन दल आणि पोलिसांना देण्यात आली. अग्निशमन दलाने घटनास्थळी जाऊन टाकीतून मृतदेह बाहेर काढला आणि तो पोलिसांच्या ताब्यात दिला. नंतर पोलिसांनी तो शवविच्छेदनासाठी लोकमान्य टिळक (शीव) रुग्णालयात पाठवला. वडाळा टीटी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव सुरेश तंगावेल देवेंद्र (३५) आहे. देवेंद्र मागील रविवारपासून बेपत्ता होता. त्याबाबत त्याच्या कुटुंबियांनी वडाळा टीटी पोलिसांकडे तक्रारही केली होती. तो पाण्याच्या टाकीत पडला असण्याची प्राथमिक शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## चिपळूण रेल्वेस्थानक रस्त्यावरील फुटपाथला झाडा-झुडपांचा वेढा

**| चिपळूण | प्रतिनिधी |**



चिपळूण रेल्वेस्थानक रस्त्यावरील फुटपाथवर गवत आणि झाडी वाढली आहे. ठग रस्त्यावर पावसाचे पाणी साचत असून वाहने जाताना पाणी अंगावर उडत असल्याने रेल्वे प्रवासी व स्थानिकांना नाहक त्रासाला सामारे लावे लागत आहे. रेल्वे स्थानकाचे मोठा गाजावाजा करीत सुशोभिकरण झाले. मात्र त्याची देखभालदेखील करण्याची आवश्यकता आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सुमारे साडेपाच कोटी रुपये खर्चून चिपळूण रेल्वे स्थानकाचे सुसोभिकरण करण्यात आले. मोठमोठ्या प्रोफ्लेक्स सीट शेड, कोकणातील निसर्गसंपदा, जीवनशैलीचे पावलोपावली घडणारे दर्शन, उभारण्यात आलेली शिल्प यामुळे हे स्थानक चिपळूणच्या वैभवात भर टाकणारे ठरत असतानाच प्रवेशद्वारासमोरील सुशोभिकरणाची नासधूस करण्यात आली आहे.

चिपळूण रेल्वेस्थानक आणि आजूबाजूचा विस्तीर्ण परिसर लक्षात घेऊन त्यादृष्टीने सुशोभिकरणाचा आराखडा तयार करण्यात आला. मागील वर्षी सुशोभिकरणाचे उद्घाटन झाले. त्याची देखभाल दुरुस्ती ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. रेल्वे स्थानक रस्त्यावरील फुटपाथवर झाडा-झुडपांनी वेढा घातला आहे. फुटपाथवरील गवत काढून रस्ता चकाचक करावा व स्थानिक नागरिकांसह प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मिलिंद कदम यांनी केली आहे.

### प्रवाशांना नाहक त्रास

उपचार प्रक्रियेला मिळणार गती | कोट्यवधीचा केला जाणार खर्च

# पालिकेच्या आरोग्य केंद्रात एक्स-रे यंत्र कार्यान्वित

**| पनवेल | प्रतिनिधी |**




पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेला नवे तंत्रज्ञान प्राप्त झाले आहे. सरकारच्या टांकसाळ या कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर निधी) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे, खारघर, कळंबोली आणि पनवेल शहर येथील चार आरोग्य केंद्रांमध्ये अत्याधुनिक एक्स-रे यंत्रणा बसविण्यात येणार आहे. ही सेवा लवकरच कार्यान्वित होणार असल्याने नागरिकांना शहरातील आरोग्य केंद्रांमध्ये मोफत एक्स-रे काढता येणार आहे.

या प्रकल्पासाठीची निविदा प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली असून पुढील काही दिवसांत या सर्व केंद्रांतील एक्स-रे यंत्रणा सुरू करण्यात येणार आहेत. त्यानंतर लोकार्पणाचा कार्यक्रम महानगरपालिकेच्या वतीने आयोजित केला जाणार आहे.

केंद्र सरकारच्या टांकसाळ कंपनीने एक्स-रे यंत्र खरेदी करून महापालिका क्षेत्रात देण्यात स्वारस्य दाखविल्यावर यासाठी तीनवेळा निविदा प्रक्रिया पार पडली. मात्र तांत्रिक अडचणी पार पडल्यानंतर अखेर चौथ्यांदा पार पडलेल्या निविदा प्रक्रियेत अडोनीस या कंपनीकडून एक्स-रे मशीन खरेदी करण्याचे निविदा प्रक्रियेत ठरले. एक कोटी ४१ लाख रुपयांचा खर्च यासाठी केला जाणार आहे. एक्स-रे मशीन हाताळण्यासाठी लागणारे तंत्रज्ञांची तरतूद महापालिकेने केली आहे.

महापालिकेने क्षयरोगमुक्त पनवेलचे उद्दिष्ट ठेवून मागील दीड महिन्यांपूर्वी व्यापक रुग्ण शोध मोहीम राबविली होती. या मोहिमेदरम्यान सुमारे ४५ हजार संशयित रुग्णांचे एक्स-रे परीक्षण करण्यात आले. त्यासाठी खासगी निदान केंद्रांबरोबरच (डायग्नोस्टिक सेंटर) महापालिकेकडील पोर्टेबल एक्स-रे यंत्रांचा वापर करण्यात आला होता.

आता या नवीन चार आरोग्य केंद्रांमध्ये कायमस्वरूपी एक्स-रे यंत्रणा कार्यान्वित झाल्याने कळंबोली, कामोठे, खारघर आणि पनवेल शहर या उपनगरांमध्येच क्षयरोग निदान आणि उपचार प्रक्रियेला मोठी गती मिळेल तसेच फुफ्फुसासंबंधी व इतर हाडांच्या विकारांमध्येही नागरिकांना तात्काळ तपासणीची सुविधा मिळणार आहे.

> “एक्स-रे यंत्रांचा वापर केवळ क्षयरोग तपासणीसाठीच नव्हे, तर विविध वैद्यकीय उपचारांमध्ये आवश्यक असलेल्या नियमित एक्स-रे तपासणीसाठीही आवश्यकतेनूसार केला जाईल. या उपक्रमामुळे पनवेल महापालिकेची प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि जनसामान्यांसाठी उपलब्ध होणार आहे.”
>
> - डॉ. आनंद गोसावी, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महापालिका

## निवडक



### पालीतील रस्त्यांना डम्पिंगचे स्वरूप

**पाली :** तीर्थक्षेत्र पाली शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. घंटागाड्यांची सुविधा असूनही नागरिक रस्त्यावर कचरा टाकत असल्याने रस्त्यांना डम्पिंगचे स्वरूप आले आहे. त्यामुळे घाणीचे साम्राज्य वाढले असून तेथे घूस, डास व भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. पावसामुळे रस्त्यावरील कचरा कुजला असून शहरात पसरलेल्या दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पालीतील कचऱ्याची समस्या दूर करण्यासाठी नगरपंचायतीकडून काही वर्षांपूर्वी घंटागाड्या सुरू करण्यात आल्या. पाच घंटागाड्यांच्या मदतीने शहरातील विविध भागांतून कचरा गोळा केला जातो. तसेच नगरपंचायतीकडून ठिकठिकाणी सूचना फलक लावून सक्त मनाईचे आदेश लावले आहेत. मात्र त्या आदेशाला केराची टोपली दाखवत काही बेशिस्त नागरिक रस्त्याच्या कडेला कचरा फेकत आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह नगरपंचायतीच्या सफाई कर्मचाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. या बेशिस्त नागरिकांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने दंडात्मक कारवाई करून शहरात जनजागृती करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.



### तळोजा फाटा समोरील रस्त्याची दुरवस्था

**नवी मुंबई :** सायन-पनवेल महामार्गावरील तळोजा फाटा समोरील रस्त्याची अतिशय खराब अवस्था झाली आहे. या मार्गावर मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक दिवसभर मोठ्या प्रमाणावर सुरु असते. पेव्हर ब्लॉक्स निघाल्यामुळे या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. वाहनचालकांना या रस्त्यावरून जाताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे नागरिकांचा संयम आता कठीण होत चालला असून जबाबदार यंत्रणेकडून तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.



### विजय धारिया, संगीता धारिया यांचा गौरव

**पाली :** भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते विजय परशुराम धारिया यांच्या सहस्रचंद्र दर्शन सोहळ्याचा आणि त्यांच्या पत्नी संगीता विजय धारिया यांच्या अमृत महोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते उभयतांचा गौरवकरण्यात आला. या कार्यक्रमाला खासदार धैर्यशील पाटील, भाजपचेज्येष्ठ नेते गिरीश तुळपुळे, नरेंद्र जाधव,अरविंद मेहता, सुभाष मेहता, अशोक मेहता, नगराध्यक्ष पराग मेहता, तालुक्यातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी मुले, सुना व नातवंडांच्या हस्ते आई वडिलांची गुळाची तुला करण्यात आली. विजय धारिया यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्रारंभीच्या कठीण काळात सुधागड तालुक्यात पक्ष संघटनेची मुळे रुजविण्याचे आणि कार्यकर्त्यांना जोडून ठेवण्याचे काम सातत्याने केले. पक्षवाढीसाठी त्यांनी घेतलेला परिश्रम आणि जनतेशी जुळवून घेतलेले नाते यामुळेच आज कमळ फुलले आहे, अशा शब्दात खासदार धैर्यशील पाटील यांनी विजय धारिया यांचा गौरव केला. एका बाजूला सहस्रचंद्र दर्शनाचा सन्मान आणि दुसऱ्या बाजूला अमृत महोत्सवअसा दुधशर्करा योग लाभल्याने या सोहळ्याचे औचित्य अधिक वाढले. या प्रसंगी कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार यांनी पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देऊन धारिया दांपत्यांचा गौरव केला.



### नेरळ गावात हरिनामाचा जयघोष

**नेरळ :** संत ध्यानेश्वर महाराज यांच्या संजीवनी समाधी सोहळ्यासाठी पालख्या आळंदीकडे निघाल्या आहेत. कार्तिकी एकादशीनिमित्त खांडस गावातून निघालेली दिंडी शनिवारी नेरळ गावातून कर्जतकडे निघाली. कर्जतकडे निघालेल्या या दिंडीमुळे नेरळ गावात हरिनामाचा जयघोष दुमदुमला. कर्जत तालुक्यातील दिंड्या खांडस या गावातील सर्वात मोठे दिंडी जाते. संपूर्ण कर्जत तालुक्यात वारकरी लहान व मोठ्या दिंड्या घेऊन कर्जत येथे रवाना होतात. श्री सद्गुरु माऊली कृपा वारकरी संप्रदाय मंडळ कर्जत तालुका खांडस नेरळ परिसर यांच्या विद्यमानाने श्री क्षेत्र आळंदी कार्तिकी पायी दिंडी सोहळा खांडस येथून सुरुवात करण्यात येते. मात्र यामध्ये एक दिंडी चाफेवाडी येथून रवाना होत. ही दिंडी खांडस येथे एकत्र होते. त्यानंतर या सर्व दिंड्या खांडस येथून पात्रज कशेळे सावळा कर्जत काढावा येथे पोहोचतात. यामध्ये खांडस ते कसे काढावे कर्जत या परिसरातील अनेक भक्त यामध्ये सहभागी होतात. नेरळ परिसरातून निघालेल्या दिंड्यांमध्ये कळंब पोशीर नेरळ मिक्सर मार्गे या दिंड्या प्रस्थापित होतात. मात्र या दिंड्याच्या नेतृत्व हभप कैलास महाराज भोईर दिंडी अध्यक्ष पंढरीनाथ तांबोली यांच्या मार्गदर्शनाखाली खाली या दिंड्या पुढे रवाना होतात. कर्जत तालुक्यातील लहान मोठ्या दिंड्या एकत्र होऊन ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीकडे रवाना होतात. या संपूर्ण दिंडी सोहळ्याचे नेतृत्व कैलास महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली केले जाते. श्री क्षेत्र आळंदी येथे कर्जत तालुक्यातील कोकण विभागीय दिंडी ओळखली जाते.

# भातकापणी, झोडणीच्या कामांना वेग

## ■ जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर; काही भागात कापणीची कामे खोळंबलीत



| पाताळगंगा | प्रतिनिधी |

पाताळगंगा परिसरात भात कापणीची लगबग सुरू आहे. काही ठिकाणी अवकाळी पावसाचा फटका बसला असला तरी सध्या पीक चांगले बहरले आहे. वाढती मजुरी व मजुरांच्या कमतरतेमुळे शेतकरी कुटुंबातील सर्व सदस्य कापणी, झोडणी, मळणी व बांधणीच्या कामाला लागले आहेत. बहुतांश ठिकाणी अद्यापही पारंपरिक पद्धतीने कापणी, झोडणीची कामे सुरू झाली आहेत. तापमान वाढू लागल्याने भल्या पहाटे शेतकरी व शेतमजूर शेतात दाखल होत आहेत.


ऑक्टोबर महिन्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे भात शेती शेतात अडवी झाली. यामुळे हातात मिळेल ते धान्य घ्यावे, तसेच परतीच्या पावसाचा जोर कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांनी शेतात भात कापणी समवेत भात झोडणी सुरु केली आहे. हातामध्ये भाताचा दाणा मिळावा या विचारांने शेतीच्या कामाची लगबग सुरु झाली असल्यांचे पहावयांस मिळत आहे. परतीच्या पावसाने भात शेतात पडले असून या वर्षी सुद्धा शेतीचे मोठे नुकसान झाले.मात्र भात कापणी केली नाहीतर हाताला दाणा मिळणार नाही. सकाळ भात कापणी आणी दुपार नंतर शेतात भात झोडणी सुरु असल्यांचे पहावयांस मिळत आहे. कारण सायंकाळी पाऊस केव्हा येईल यांची शाश्वती नाही. मात्र या वेळेतच घरातील सदस्य तसेच शेत मजूर घेवून भात कापणी समवेत भात झोडणी शेतात सुरु आहे. परतीच्या पावसाच्या भीतीने, शेतकरी आजही चिंताग्रस्त झाले आहे. सूर्याच्या उत्तम प्रकाशाने कापलेली भात (कडपा) शेतामध्ये सुकून, शेतामध्ये झोडणी शेतकऱ्यांनी चालू केली. या वर्षी परतीच्या पावसाने घात केला असून शेतकऱ्याकडे असणारे गुरे, वासरे यांना पेंढा, चारा मुबलक प्रमाणात मिळणार नाही. याची चिंता जणू शेतकऱ्याला लागली आहे.अजून काही भागात भात शेती कापणीची कामे खोळंबली आहे. तर काही अल्प शेतकऱ्यांनी भात कापणी झाली आहे.

पावसात पेंढा भिजल्याने कुजलेला आणि बुरशी आलेला हा पेंढा जनवारांच्या खाण्यायोग्य राहिला नाही. त्यामुळे जनावरांच्या चार्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मागील आठवड्यात देखील जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. काही शेतकऱ्याने पिकविलेला भात सुरक्षित ठिकाणी ठेवला असला तरी गुरा-ढोरांच्या चाऱ्यासाठीचा पेंढा ठेवला होता. भिजलेला हा पेंढा आता कूजु लागला असुन त्यावर काळी बुरशी येऊ लागली आहे.

### पेंढा कुजलेला

गुरा-ढोरांच्या खाण्यालायक पेंढा राहिलेला नाही. रानातील हिरवे गवत देखील आता सुकले आहे. अशा परिस्थितीमध्ये दुभत्या जनावरांचा आणि ढोरांना खायला काहीच राहिले नसल्याने काही दिवसांतच जनावरांवर उपासमारीची वेळ येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्यामुळे बळीराजा चिंतातुर झाला आहे.

# कर्जतमध्ये धुक्यामुळे आनंदाचे वातावरण



| नेरळ | प्रतिनिधी |

लांबलेला पावसाळा परतीच्या वाटेवर असल्याचे चित्र सकाळच्या वेळी धुक्याची दुलई दिसून येऊ लागल्याने जाणवत आहे. नोव्हेंबर महिन्यात थंडीची चाहूल लागली असून मागील काही दिवस सुरु असलेला पावसाचा खेळ संपून खऱ्या अर्थाने हिवाळी सुरु झाल्याने या हंगामाचे स्वागत होऊ लागले आहे. माथेरानचे तापमान १५.०४ अंशावर आले असल्याने तेथे गुलाबी थंडी अनुभवास मिळू लागली आहे.

यावर्षी पाऊस नोव्हेंबर महिना सुरु झाला तरी थांबण्याचे नाव घेत नव्हता.अखेर मे महिन्यात सुरु झालेला पावसाळा नोव्हेंबर महिन्याचे दुसऱ्या आठवड्यात परतीच्या मार्गावर असल्याचे आशादायक चित्र कर्जत तालुक्यात दिसून येऊ लागले आहे. सहा महिने पावसाने झोडपून काढल्याने यावर्षी थंडी सुरु होणार कि नाही अशी शंका व्यक्त केली जात होती. ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत थंडीची सुरुवात होते, मात्र यावर्षी ऑक्टोबर महिन्यात अति मुसळधार पाऊस कोसळला त्यामुळे सहा महिन्यापर्यंत लांबलेला पाऊस थांबणार कि नाही अशी भीती व्यक्त होत होती. सप्टेंबर महिन्यात तयार होणारी भाताची शेती यावर्षी पावसाच्या पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे यावर्षी थंडीचे महिने नक्की कोणते? हिवाळा हंगाम यावर्षी असणार कि नाही? यावर चर्चा होत होत्या.

अखेर नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात धुक्याची दुलई दिसून येऊ लागली आहे. सकाळच्या वेळी चालण्यासाठी मॉर्निंग वॉक निघणाऱ्याना सुखद धक्का मिळत आहे. थंडीची चाहूल लागल्याने आणि मागील दोन दिवस सकाळचे वेळी थंडी अनुभवता येऊ लागल्याने सकाळच्या वेळी चालण्यासाठी घराबाहेर पडणारे यांची संख्या वाढली आहे. त्यात माथेरानमध्ये हिवाळ्यात गर्दी पर्यटक हे गुलाबी थंडीचा आस्वाद घेण्यासाठी येत असतात. माथेरानमधील आजचे तापमान हे १५ अंशावर खाली आल्याने थंडीची चाहूल दिसून येत आहे. माथेरानमधील थंडी पर्यटकांना आपल्याकडे खेचून येणारी असल्याने गुलाबी थंडीचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांची पाऊले वळतील असा आशावाद माथेरानमधील व्यावसायिकांना आहे.

# इमारतींसाठी फायर एक्झिट बंधनकारक

| उरण | प्रतिनिधी |

अग्निशमन दलाने सुधारित अग्निसुरक्षा नियमावली जाहीर केली असून, सर्व निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक इमारतींना फायर एक्झिट आणि फायर सेफ्टी सिस्टिम बंधनकारक करण्यात आली आहे. परवानग्या आता पूर्णपणे ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत, अर्जदारांनी ऑटोडीसीआर पोर्टलवर अर्ज भरावा आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील.

अर्जदारांनी इमारतीचा आराखडा, अग्निसुरक्षा उपकरणे, आपत्कालीन निर्गमन मार्ग, फायर रेसिस्टंट साहित्य याची माहिती अपलोड करावी. अधिकारी १५ दिवसांत प्राथमिक तपासणी करतील. प्रत्येक मजल्यावर फायर उपकरणे, स्मोक अलार्म, फायर एक्झिट, फायर एनओसीचे वार्षिक नूतनीकरण बंधनकारक. औद्योगिक व संस्थात्मक इमारती : रुग्णालये, शाळा, प्रयोगशाळा, ऑक्सिजन व ज्वलनशील वस्तूंच्या साठवणुकीसाठी स्वतंत्र सुरक्षा योजना बंधनकारक. उरण, जुईनगर, खारघर, कामोठे, पनवेल, बेलापूर परिसरातील उंच इमारतींवर अग्निशमन विभागानं विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. फायर एक्झिट नसलेल्या किंवा एनओसी नूतनीकरण न केलेल्या इमारतींवर थेट दंड, सील किंवा परवानगी रद्दीकरण कारवाई होणार आहे.



## करंजाडे येथे मराठी रंगभूमी दिन साजरा

| पनवेल | प्रतिनिधी |

करंजाडे येथे मराठी रंगभूमी दिन कार्यक्रम मायबाप प्रेक्षकांच्या साथीने संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सिने लेखक- दिग्दर्शक ज्येष्ठ लेखक दिग्दर्शक केदार शिंदे यांचे छोटे बंधू मंदार शिंदे, रेडिओ प्रतिनिधी आकाशवाणी- मुंबईच्या परिणीता सावंत, रंगभूषा-नेपथ्य दिग्दर्शक झी २४ तास- एस्सेल ग्रुप मुंबईचे नंदादीप तांबे, रविकांत भोपी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मराठी रंगभूमी दिनानिमित्त आपले विचार प्रगट केले.

या कार्यक्रमाचे समन्वय आणि आयोजक महेश लाड हे होते. हा कार्यक्रम प्रमुख मान्यवर आणि मायबाप प्रेक्षकांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

# शेतकरी संघटनेचा तहसील कार्यालयावर मोर्चा

| माणगाव | प्रतिनिधी |

ओला दुष्काळ जाहीर करा, पीक कर्ज माफ करा, सरसकट शेतकऱ्यांना ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्या, अशी मागणी सरकारकडे करीत माणगावात तालुका शेतकरी संघटनेतर्फे तहसील कार्यालयावर सोमवार (दि.१०) नोव्हेंबर रोजी विराट मोर्चाचे आयोजन संघटनेचे तालुकाध्यक्ष ज्ञानदेव पवार व अनिल नवगणे, भागोजी डवले व संघटनेचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला होता.




यावेळी शेतकरी संघटनेतर्फे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन माणगाव तालुक्याचे निवासी नायब तहसीलदार विपुल ढुमे यांना देण्यात आले. यावेळी मोर्चेकरांना आश्वासित करताना निवासी नायब तहसीलदार विपुल ढुमे यांनी आपल्या भावना आम्ही ऐकल्या असून त्या भावना शासनापर्यंत पोहचवून त्यातून सकारात्मक यश मिळेल असे सांगितले.

या मोर्चाला संघटनेचे सरपंच कदम, अशोक पाटील, सखाराम जाधव, वडेकर गुरुजी, नितीन वाघमारे, नितीन दसवते, सुभाष गुगळे, दिनेश गुगळे, सीताराम भोनकर, नामदेव शिंद, संदेश गुगळे,योगेश गुगळे, विलास गोठलं,बाळा मांजरे, प्रवीण बागवे, सुधाकर पालकर, अंजली पवार, विश्वंभर दांडेकर, सचिन सत्वे, कैलास पोवार, काशीराम पोवार, बाबू पाखुर्डे, चंद्रकांत सत्वे,नंदू वाढवळ, यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, सदस्य तसेच शेतकरी बांधव - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘मठोबा’ या कथेस प्रथम क्रमांक

| पाली | प्रतिनिधी |

अलिबाग जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असणारे कर्मचारी तथा सुधागड तालुक्यातील रासळ गावचे कवी लेखक शैलेश खाडे यांनी लिहिलेल्या ‘मठोबा’ या कथेस कथालेखन स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. मराठी भाषा विभाग, मुंबई (महाराष्ट्र शासन), महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई कलारंग सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था यांच्या विद्यमाने कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा-अलिबाग यांच्या प्रमुख सहकार्याने जिल्हा साहित्य संमेलन २०२५ वर्ष पहिले दि ८ व ९ नोव्हेंबर रोजी गे. ना. परदेशी साहित्य नगरी, कित्ते भंडारी हितवर्धक मंडळ हॉल, अलिबाग-रेवदंडा रोड, अलिबाग-रायगड येथे आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी अरुण म्हात्रे, रमेश धनावडे, कांतीलाल कडू आदि मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले. त्याचे पाली कोकण मराठी साहित्य परिषद कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.



# पायी वारी दिंडीचे स्वागत

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील कोकण दिंडी वारकरी संप्रदाय मंडळ रोहा या दिंडीचे नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित रा.ग.पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब येथे मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. तालुक्यातील गावठाण येथून आळंदीकडे निघालेल्या कोकण दिंडी वारकरी संप्रदाय मंडळ रोहा या दिंडीचे खांब येथील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब येथे स्वागत करण्याची अनेक वर्षांची परंपरा चालू आहे. या दिंडीचे संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे, रामचंद्र चितळकर सुरेश जंगम व सर्व शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांच्या हस्ते यथोचित स्वागत करून सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्रातील नाट्यरसिक व कलाकारांना मेजवानी | उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजरत्न पुरस्कार

# पालीत रंगणार राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा



| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने पालीत (दि.१८) डिसेंबरपासून राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा रंगणार आहेत. या स्पर्धा १३ वर्षांपासून अविरत पणे सुरू आहेत. येथील ग. बा. वडेर हायस्कुल पालीच्या भव्य रंगमंचावर या स्पर्धा होणार आहेत. जनता या स्पर्धेवर प्रेम करते. जनतेला या एकांकिका स्पर्धेची ओढ लागलेली असते. त्यामुळे या स्पर्धेचे सात दिवस जणू पालीत व जल्लोष पहावयास मिळत आहे. स्पर्धेच्या उद्घाटनास सिने अभिनेते व विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेचा समारोप व बक्षिस समारंभ (दि.२४) डिसेंबर रोजी होणार आहे. समारोपावेळी नाट्यरसिकांना पाहण्यासाठी एक दर्जे दार नाटक मोफत असणार आहे. या स्पर्धामुळे पाली गावचे नाव राज्य व देशपातळीवर मोठ्या उंचीवर गेले आहे. पालीतील स्पर्धेत सादरीकरण करणाऱ्या कलाकारांनी पुढे अनेक टिव्ही मालिका व चित्रपट सृष्टीत पदार्पण करुन आपल्या प्रतिभेने अभिनय क्षेत्रात छाप पाडली आहे. अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव यांनी दिली.

यावर्षी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्वाचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव होणार आहे. तसेच सुधागड तालुक्यातील सामाजिक कार्य करणाऱ्या चार ते पाच समाजसेवकांना समाजरत्न पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान देखील करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा दरवर्षी नव्या रुपात व नव्या संकल्पनेतून साकारल्या या स्पर्धेत मुंबई, ठाणे, पुणे, कोकण, आदींसह राज्यातील तसेच गोव्यातील एकांकिका संघ व सहभागी होणार आहेत. एकांकिका स्पर्धेत सांघिक प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या एकांकिका संघाला १ लाख रुपये व आकर्षक चषक, द्वीतीय क्रमांकास ७५ हजार व आकर्षक चषक, तृतीय क्रमांकास ५० हजार रुपये व आकर्षक चषक, चतुर्थ किंवा लक्षवेधी क्रमांकास २५ हजार रुपये व आकर्षक चषक देवून गौरविण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या एकांकिका संघाला स्वतंत्रपणे १५ हजार रुपये व आकर्षक चषक देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच वैयक्तीक अभिनयाकरीता प्रोत्साहनपर पारितोषिक दिली जाणार आहेत. अधिक माहितीसाठी वेत्रवान गुरव ९०२८५९२०९०, अभिजीत चांदोरकर, ८९८३७१३७६९, शरद निकुंभ ८४०८९३०३६५ यांच्याशी संपर्क साधावा असे सांगण्यात आले. यावेळी वेत्रवान गुरव, अभिजित चांदोरकर, शरद निकुंभ, सचिन मोरे, विक्रम काटकर, सुहास लोखंडे, शेखर राऊत, सुशील शिंदे, आशिष हजारे, ऋषिकेश पिंपळे, मिलिंद सातूर्डेकर, दत्ता सावंत आदींसह पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

> “गेल्या १३ वर्षांपासून प्रतिष्ठानने रंगभूमीच्या संवर्धनासाठी घेतलेला हा पुढाकार म्हणजेच नाट्यप्रेमींसाठी दरवर्षीची सांस्कृतिक पर्वणी बनली आहे. रात्री उशिरापर्यंत रंगणारे नाट्यप्रयोग, उत्साही प्रेक्षकांची उपस्थिती आणि नवोदित कलाकारांचा जोश या साऱ्यांनी पालीची एकांकिका स्पर्धा राज्याच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेतील अविभाज्य ठरली आहे.
> -शरद निकुंभ, सचिव”

## निवडक

### अनुसया कलमकर यांचे निधन



**सुतारवाडी** : पळी-आंबेघर येथील अनुसया काशिनाथ कलमकर यांचे वयाच्या ९९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा मुले नातवंडे असा मोठा परिवार आहे. मनमिळावू स्वभाव परोपकारी वृत्ती भक्तीची आवड असलेल्या अनुसया यांच्या निधनाची वार्ता समजतात अनेकांनी अंत्यदर्शन घेतले. त्यांचा दशक्रियाविधी शनिवार (दि. १५) नोव्हेंबर रोजी दिवलंग ढोलपाडा पेझारी येथे तर उत्तरकार्य मंगळवार (दि.१८) नोव्हेंबर रोजी राहत्या घरी पळी आंबेघर ता. अलिबाग येथे होणार असल्याचे दत्तात्रेय कळमकर यांनी सांगितले.

### पळस्पे येथे डिझेलची चोरी

**पनवेल** : पनवेल तालुक्यातील पळस्पे फाटा येथे पार्क केलेल्या ट्रकमधून अज्ञात चोरट्याने २६० लिटर डिझेलची चोरी केल्याची घटना घडली आहे. ट्रकचालक राम राऊत हा त्याच्या ताब्यातील ट्रक (एमएच ०१ ईई ३६८३) हा पळस्पे फाटा येथे पार्क करून झोपला असतांना कोणीतरी अज्ञात चोरट्याने ट्रकमधून सुमारे २३ हजार रुपये किमतीचा २६० लिटर डिझेल चोरून नेला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पाण्याच्या मोटारची चोरी

**पनवेल** : पाण्याच्या टाकीची तोडफोड करून तेथील वस्तूंची चोरी केल्याप्रकरणी प्रणव गडकरी (रा. चिखले) याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला. चिखले येथील पाण्याच्या टाकीची तोडफोड करून प्रणव याने येथील पाण्याची मोटार, पाईप आणि इतर वस्तू अशा प्रकारे ५० हजारांपेक्षा जास्त किमतीचा ऐवज चोरुन नेला होता, या घटनेची माहिती सरपंच, ग्रामसेवकांना मिळाल्यानंतर त्यांनी त्वरीत हे साहित्य प्रणव याने ज्या भंगारवाल्याला विकले होते त्याच्या कडून हे साहित्य त्यांनी ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात प्रणव गडकरी याच्या विरोधात गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.

### बियर शॉपमध्ये चोरी

**पनवेल** : दोन अनोळखी इसमांनी बियर शॉपचा छताचा सीमेंटचा पत्र आणि सिलिंग तोडून बिअर शॉपमध्ये प्रवेश करत तेथून २१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजू बडेकर (रा.पाले खुर्द,चौक) यांनी बेगम शेख (भिंगारवाडी) त्याच्याकडून शेख बियर शॉपी भाड्याने चालवण्यास घेतले आहे. त्याच्या या दुकानात अज्ञात चोरट्याने दुकानाच्या छताचे पत्रे तोडून या दुकानात प्रवेश केला. त्यानतर त्याने दुकानात ठेवलेली २० हजार रुपयंची रोकड, मोबाईल चार्जर आणि बियरचे कॅन चोरून तेथून पसार झाला. या प्रकरणी संजू बडेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा नोंद करुन त्याचा शोध सुरू केला आहे.

### ॲक्टिवा मोटारसायकलची चोरी

**पनवेल** : पनवेल शहरातील इसराईल मजिद जवळ मातोश्री निवास येथे पार्क करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. विद्या सुभाष भोईर यांनी त्यांच्या मालकीची १५ हजार रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची होंडा ॲक्टिव्हा (एमएच ४६ ओएन ११९१) हि शहरातील इसराईल मजिद जवळ मातोश्री निवास येथे पार्क करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### तळ्यामध्ये थंडीची चाहूल

**तळा** : तळा शहरात गेल्या चार दिवसांपासून पहाटे धुके पडत असून सोमवारपासून पहाटेच्या वेळी अंगाला गार वारा झोंबत असल्याने थंडी जाणवू लागली आहे.यावर्षी उशिरापर्यंत पावसाने आपली बॅटिंग चालविल्याने थंडीची चाहूल उशिराने लागली आहे. ऋतू बदलाची वर्दीच निसर्गाने जणू यानिमित्ताने दिली आहे. दरवर्षीच्या प्रघाताप्रमाणे दिवाळीतील पहिल्या अभ्यंगस्नानाला वातावरणात गारवा जाणवून थंडीची चाहूल लागते. मात्र यावर्षी दिवाळीपर्यंत पाऊस लांबल्याने थंडी उशिराने जाणवू लागली. थंडीची चाहूल लागल्याने अनेक उत्साही नागरिकांनी पहाटेचे शुभ्र धुके व अंगाला झोंबणारा गार वारा अनुभवण्यासाठी पहाटेचा व्यायाम सुरू केला आहे. येत्या आठ दहा दिवसात थंडीचा प्रभाव वाढेल आणि ऋतू पूर्णपणे आपली कुस बदलेल असा जाणकारांचा अंदाज असून थंडीसाठीचे उबदार कपडे हळू हळू बाहेर निघतील.व लोक शेकोटीची ऊब घेण्यासाठी पुढे सरसावतील.थंडीचा हा हंगाम आल्हाददायक असल्यामुळे तळा वासियांसाठी नवचैतन्य आणणारे आहेत.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अकाउंटट पाहिजे- पात्रता B com, Tally अनुभव ५ वर्षे ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार - २५००० महिना Contanct - 9823585321
- ''जन्नावार हॉस्पीटल'' अलिबागमध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No : 7798034509
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- पाहिजे- अलिबागस्थित वृद्ध जोडप्यास सकाळी साडेदहा ते दीडवाजेपर्यंत किचन मदतनीस बाई. पगार पाच हजार आणि एका वेळचे जेवण. संपर्क- ८५३०३०९७६५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कामगारांच्या न्याय्यहक्कासाठी संघटनेची स्थापना

**रसायनी :** कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी लढा देण्यासाठी 'तीर्था श्रमिक माथाडी व जनरल कामगार संघटना' स्थापन करण्यात आली आहे. या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अरुण गोविंद जाधव असून, त्यांचा उद्देश माथाडी कामगार, जनरल कामगार आणि सर्वसामान्य श्रमिकांना न्याय मिळवून देणे हा आहे. दरम्यान, जाधव हे यापूर्वीच 'पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट'मार्फत पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. पर्यावरण संवर्धनाबरोबरच कामगारांवरील होणारा अन्याय, असुरक्षित कामाचे वातावरण आणि सामाजिक दुर्लक्ष या समस्यांवर त्यांनी स्वतःच्या पुढाकाराने आवाज उठवला आहे. कामगारांचे प्रलंबित हक्क, वेतन सुरक्षा, विमा, आणि कामाच्या अटी याबाबत सक्रीय भूमिका घेऊन संघटना सर्व कामगारांचे प्रतिनिधित्व करणार आहे. कामगारांना सन्मानाने जगता यावे आणि त्यांचा न्याय्य हक्क मिळावा, हेच आमचे ध्येय आहे, असे संस्थापक अध्यक्ष अरुण गोविंद जाधव यांनी सांगितले. ही संघटना लवकरच राज्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये शाखा स्थापन करून कामगारांच्या समस्यांसाठी सतत लढा देणार आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-वांजळे, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील श्री. ज्ञानेश्वर अर्जुनराव साबणे, यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. पांडुरंग रत्नू ठाकरे, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे...

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ३८ | ०.६०.४०<br>या एकूण क्षेत्रापैकी<br>०.२०.०० इतके क्षेत्र विकत देणेचे ठरले आहे. | ७.६२ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
कर्जत दि. ११/११/२०२५ मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, १. निधि नीलेश चव्हाण, २. गौरी नीलेश चव्हाण, यांनी फ्लॅट मालक १. सुनिल गौरू महाडीक २. कुंदा सुनिल महाडीक, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची खालील वर्णनाची फ्लॅट मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे दहिवली तर्फे नीड, येथील स.नं. ४०/१ व मौजे आकुर्ले ता. कर्जत येथील स.न. ९२/०, ०९४/०/९५/०, ९६/०, ९८/०, व ९९/१ संपुर्ण क्षेत्र २५५९० चौ. मी. या वरील ''शिवम गार्डन'' (गार्डन्स सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित) या इमारतीमधील बिल्डींग नं.१. विंग बी ४ था मजला सदनिका ४०२ क्षेत्र ४४४ चौ. फुट कारपेट (कर्जत नगरपरिषद मालमत्ता क्र. Z300717) अशी फ्लॅट मिळकत आहे.**

वर वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच फ्लॅट विक्री करारनामा करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
कर्जत दि. ११/११/२०२५ मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी श्री.महमद तफशिरयार महमद खान यांचेकडून बक्षीसपत्राने घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे हनुमाननगर, ता.तळा, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|
| १५ | २.७०.०० | १.११ |

तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल बक्षीसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ११-११-२०२५
**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो. नं - ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर हरकत नोटीस

तमाम सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे मेचकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं.१०/३/ब, १०/९ व ११/३ या मिळकतींचे मालक श्री. आशिषकुमार अनिल दास वगैरे यांचेकडुन सदर मिळकती आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरले असुन त्याबाबत जमिन मालक व आमचे अशिलांमध्ये विक्री व्यवहार ठरला आहे. व सदर विक्री व्यवहारापोटी आमचे अशिलांनी जमिन मालकांस मोबदला रक्कमही दिलेली आहे.

तरी सदर मिळकतींचे मालक श्री.आशिषकुमार अनिल दास वगैरे यांचेसोबत आमचे अशिलांचे अपरोक्ष व त्यांचे संमती शिवाय सदर मिळकतींबाबत कोणीही कोणतेही विक्री व्यवहार वा दस्त करु नयेत. त्याबाबत आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. मात्र तरीही सदर मिळकतींचे मालक श्री.आशिषकुमार अनिल दास वगैरे यांचेसोबत आमचे अशिलांचे अपरोक्ष व त्यांचे संमती शिवाय सदर मिळकतींबाबत कोणीही कोणतेही विक्री व्यवहार वा दस्त केल्यास सर्व संबंधितांवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल. व असे व्यवहार व दस्त आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
''श्री सदगुरू कृपा'', १४४ अ,
मु. पो. शेलु, ता. कर्जत, जि. रायगड.
मोबा. नं. ९८६०६२६२४६.

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतिचे विद्यमान मालक मिनाल प्रकाश दिलेहर सिंह पस्ताला यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव- वाघोलीवाडी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ६९/२, एकूण क्षेत्र ००-२१-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ०.३०/- धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/११/२०२५

**झुंजारराव आणि कं.करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री.सरफराझ अकबरअली घुघारिया यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्री.किशन मूलचंद चावला, २) श्री.मारूफ मोहसीन शेंदू, यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णनः**

**मौजे पोशिर, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | हे.आर.चौ.मी. | रूपये | पैसे |
| ११४ | ११/अ/१ | ०-८९-००<br>पो.ख.०-०६-००<br>एकुण ०-९५-०० | ० | ५६ |
| ११४ | ११/अ/२ | ०-२७-००<br>पो. ख. ०-०२-००<br>एकुण ०-२९-०० | ० | १७ |
| ११४ | ११/अ/३ | ०-२३-४०<br>पो.ख. ०-०१-६०<br>एकुण ०-२५-०० | ० | १४ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ११/११/ २०२५ सही /-
पत्ताः १०१, १०२, १०३, बुरहान प्लाझा,
दिलकप कॉलेज रोड, ममदापुर, पो. नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०१०१
मो. ८८०६०२५८३१
**ॲड. भावेश रघुनाथ विरले**
(वकिल उच्च न्यायालय)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - पवेळे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नं. ४२/१, एकूण क्षेत्र ०-४०-२० हे. आर., आकार ८.५६ रू. पै. पैकी सुजित कुमार सुशिलन यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२०-१० हे. आर., आकार ४.२८ रू. पैसे तसेच गट नं.४२/१, एकूण क्षेत्र ०-४०-२० हे. आर., आकार ८.५६ रू. पै. पैकी सुधा रविंद्रन यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२०-१० हे. आर., आकार ४.२८ रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १०/११/२०२५ **(ॲड.संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

दिनांक : ११ नोव्हेंबर, २०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन विकसीत करण्याकरीता घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विकसन कराराच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला विकसन करारनामा लिहुन व नोंदवुन ठेवतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-धामोते, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| १) राम पांडुरंग जगे<br>२) दानिश मुस्ताक नाचण<br>३) मतिन रज्जाक लगड | ४९ | २ | ००-११-४० | १ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही /-
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला,
साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ,
नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१
**नितीन अर्जुन क्षिरसागर**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- ११/११/२०२५
मो. नं. ९३७२९६४६६५

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात
अर्ज क्र. ५१३/२०२५

हबिबुर रहमान युनूस जलगावकर
साई ता. माणगांव जि. रायगड ... अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मुख्याधिकारी, ग्रामपंचायत नगरपंचायत माणगाव
ता. माणगाव, जि. रायगड ... सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. हबिबुर रहमान युनूस जलगांवकर यांचा जन्म/मृत्यू मौजे माणगांव (साई) ता. माणगांव, जि. रायगड याठिकाणी दि. १४/०९/१९७४ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि. १९/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू माणगांव येथे दि. १४/०९/१९७४ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/मतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. १४/०९/१९७४ रोजी माणगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव सही/-
दिनांक : ०६/११/२०२५
**(दशरथ काळे)**
कार्यकारी दंडाधिकारी
माणगाव, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांनी श्री.महमद तपशिरयार महमद खान यांचेकडुन बक्षीसपत्राने घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे हनुमाननगर, ता. तळा, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|
| २८ | ३.४४.०० | १.७१ |

**तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा**

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल बक्षीसपत्राचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ११-११-२०२५
**ॲड.दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो. नं-९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

दिनांक : ११ नोव्हेंबर २०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| संतोष आत्माराम तांबोळी<br>सायली संतोष तांबोळी | ६५ | २ | ०-००-९० | ० | ०३ |
| | ६५ | ३ | ०-०१-४० | ० | ०३ |
| | ६५ | ५ | ०-३१-०० | ० | २२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ११/११/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - लांडीवली, ता.कर्जत, जि.रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली बिनशेती जमीन मिळकत आमचे अशील सिद्धीराज भगवान गुरव, यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुनील हरिभाऊ पालांडे, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**-: बिनशेती मिळकतीचे वर्णन :-**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ३३/२/ड | ३.७१.०० | ७.४२ |

सदरहू जमीन बिनशेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी**
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि.दुसरा मजला, ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
कर्जत दि. ११/११/२०२५ मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## LOSS OF DOCUMENT NOTICE

I, PRASHANT NACHAN PANDURANG, residing at A-504, Akhil, Gole Wadi, Kulgaon, Near Talathi Office, Badlapur, District Thane. 421503, had purchased Plot No. 6, Survey No. 409 situated at Village Neral, Taluka Karjat, District Raigad from B. Chandrashekhar. I have taken the custody of the previous link Agreement dated 22/04/2004, registered in the office of Sub Registrar Karjat at Serial No. 1051/2004 on dated 22/04/2004 of the above mentioned land from B. Chandrashekhar. I have lost/misplaced the above mentioned original Agreement dated 22/04/2004 executed between Vasanti Vasudeo Pitkar through her power of attorney holder Mr. Prabhakar Kanhaiyalal Sonar and B. Chandrashekhar, which is not traceable despite diligent search.
If anyone finds or has any claim/objection regarding the said document, kindly inform me at the below address/phone/email within 7 days of this notice, failing which it shall be presumed that the said document has no valid claim.

Contact Details:
Name: PRASHANT NACHAN PANDURANG
Address: A-504, Akhil, Gole Wadi, Kulgaon,
Near Talathi Office, Badlapur, District Thane. 421503
Phone: 9850122444
Email: prashantnachan63@gmail.com

Sd/-
[Signature]
PRASHANT NACHAN PANDURANG
Date: 13/10/25
Place: Badlapur

## LOSS OF DOCUMENT NOTICE

I, KAVITA SINHA, residing at Flat No. 502, Tower-7, Shree Krishna Paradise CHSL, Plot No. D/69, Near Prime Mall, Sector-12, Kharghar, Navi Mumbai-410210, had purchased Plot No. 5, Survey No. 409 situated at Village Neral, Taluka Karjat, District Raigad from Prashant Kunverji Gupta. I have taken the custody of the previous link Agreement dated 08/07/2004 and 19/01/2010 of the above mentioned land from Prashant Kunverji Gupta. I have lost/misplaced the original Agreement as mentioned below.
1. Agreement dated 08/07/2004 registered in the office of Sub Registrar Karjat at Serial No. 1780/2004 on dated 08/07/2004 executed between Vasanti Vasudeo Pitkar through her power of attorney holder Mr. Prabhakar Kanhaiyalal Sonar and Nilesh Kunverji Gupta, Prashant Kunverji Gupta,
2. Agreement dated 19/01/2010 registered in the office of Sub Registrar Karjat at Serial No. 378/2010 on dated 19/01/2010 executed between Nilesh Kunverji Gupta and Prashant Kunverji Gupta
The above mentioned Two Original Agreements which are not traceable despite diligent search.
If anyone finds or has any claim/objection regarding the said document, kindly inform me at the below address/phone/email within 7 days of this notice, failing which it shall be presumed that the said document has no valid claim.

Contact Details:
Name: KAVITA SINHA
Address: Flat No. 502, Tower-7,
Shree Krishna Paradise CHSL, Plot No. D/69,
Near Prime Mall, Sector-12, Kharghar,
Navi Mumbai-410210
Phone: 9867120976
Email: sanjaysinha68@rediffmail.com
Sd/-
[Signature]
(Kavita Sinha)

## गुप ग्रामपंचायत सानेगाव
### ता. रोहा, जि. रायगड.

दिनांक :- १०/११/२०२५

**निविदा सूचना**
**टक्केवारी दराची**

ग्रुप ग्रामपंचायत सानेगाव ता.रोहा, जि.रायगड यांच्याकडून १५ वा वित्त आयोग २०२५-२०२६ अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी नोंदणीकृत ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर संस्था यांचेकडून टक्केवारी दराची लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. निविदा दिनांक: ११/११/२०२५ ते १८/११/२०२५ या कालावधीत सुटीचा दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात पाठवाव्यात पोस्टाने आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच अपूर्ण निविदा उशिरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदा दिनांक :१९/११/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच अध्यक्षतेखाली उघण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचा प्रकार | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जलशुद्धीकरण साहित्य खरेदी करणे. | बंधित | ६५,०००/- | १% | २००रु | ६ महिने |
| २ | मौजे सानेगाव टाकीची विहीर दुरुस्ती करणे. | बंधित | १,००,०००/- | १% | २००रु | ६ महिने |
| ३ | मौजे यशवंतखार वाव्ल्याची विहीर दुरुस्ती करणे. | बंधित | १,००,०००/- | १% | २००रु | ६ महिने |
| ४ | मौजे सानेगाव बौद्धवाडी विहिरीला जाळी बसविणे. | बंधित | ४०,७००/- | १% | २००रु | ६ महिने |
| ५. | सार्वजनिक कचरा कुंड्या खरेदी करणे. | बंधित | १९,२००/- | १% | २००रु | ६ महिने |
| ६ | मौजे यशवंतखार येथे सार्वजनिक शोषखड्डे बांधणे. | बंधित | ९०,५००/- | १% | २००रु | ६ महिने |
| ७ | मौजे सानेगाव येथे सार्वजनिक शोषखड्डे बांधणे. | बंधित | ५६,०००/- | १% | २००रु | ६ महिने |
| ८ | ग्रामपंचायत कार्यालय येथे सोलर बसविणे. | बंधित | १,४०,०००/- | १% | २००रु | ६ महिने |
| ९ | भैरवनाथ मंदिर ते चिंतामणी गडेकर यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | अबंधित | २,५०,०००/- | १% | २००रु | ६ महिने |
| १० | मौजे सानेगाव, यशवंतखार येथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे खरेदी करणे. | अबंधित | ५०,०००/- | १% | २००रु | ६ महिने |
| ११ | मौजे सानेगाव बस स्थानक जवळील विहिरीला जाळी बसविणे. | अबंधित | ४०,७००/- | १% | २००रु | ६ महिने |
| १२ | मौजे सानेगाव आ.वाडी येथे बोअरवेल पंप खरेदी करणे. | अबंधित | २६,१४०/- | १% | २००रु | ६ महिने |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे-**

१) निविदा दि. ११/११/२०२५ ते १८/११/२०२५ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील व १९/११/२०२५ रोजी मा. सरपंच सानेगाव यांच्या उपस्थितीत उघण्यात येतील.
२) प्रत्येक निविदा स्वतंत्र असावी व सोबत GST प्रमाणपत्र, पॅनकार्ड, सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रमाणपत्र एकाच लखोट्यात असावे.
३) ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
४) निविदा फॉर्म फी परत मिळणार नाही.
५) काम करणेपूर्वी जागेवरचा फोटो व काम पूर्ण झाल्यावरचा फोटो ठेकेदाराने दिल्याशिवाय कामाचे बिल अदा केले जाणार नाही.
६) काम मंजूर झाल्यावर ठेकेदाराने रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारासह स्वखर्चाने करारनामा करून द्यावा लागेल.
७) काम पूर्ण झाल्यावर ठेकेदाराने कामाची माहिती दर्शविणारा बोर्ड जागेवर लावणे आवश्यक आहे.
८) कामाची देखरेख पंचायत समितीच्या तांत्रिक इंजिनियर यांच्या आदेशाप्रमाणे व आराखड्याप्रमाणे होणे बंधनकारक आहे.
९) ठेकेदाराच्या बिलातून GST, सुरक्षा अनामत, रॉयटी सरचार्ज, तसेच अन्य कापती शासनाच्या नियमानुसार करण्यात येतील.
१०) ग्रामपंचायतीकडे जसा निधी उपलब्ध होईल तसा ठेकेदाराला देण्यात येईल त्याची कोठेही तक्रार करता येणार नाही.
११) काम पूर्ण झाल्यापासून ६ महिन्यानंतर कामाची स्थितीपाहून सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.
१२) ठेकेदार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे. PFMS प्रणालीशी सलग्न असावे.


**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत सानेगाव**
**ता. रोहा, जि. रायगड.**

# निवडक



## कुस्ती प्रशिक्षक संपत्ती येळकर यांना महाराष्ट्राचे द्रोणाचार्य पुरस्कार

**पनवेल :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड अलिबाग आणि कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा २०२५ या ६ ते ८ नोव्हेंबरदरम्यान खोपोली येथे उत्साहात पार पडल्या. याच स्पर्धेच्या औचित्याने भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास आणि टाटा स्टील यांच्या वतीने पोलीस मुख्यालय कुस्ती संकुलाचे कुस्ती प्रशिक्षक संपत्ती येळकर यांना महाराष्ट्राचे द्रोणाचार्य पुरस्काराने गौरविण्यात आले. कुस्ती प्रशिक्षण क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ आणि योगदानमूलक सेवेला दिलेल्या या सन्मानावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. यात रायगड जिल्हा कुस्ती संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर, टाटा समूहाचे शशी भूषण, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, राज्य क्रीडा मार्गदर्शक नीलकंठ आखाडे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मारुती आडकर, कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यासचे अध्यक्ष राजाराम कुंभार व जगदीश मरागजे यांचा समावेश होता. पुरस्कारामुळे पोलीस मुख्यालय कुस्ती संकुल तसेच रायगड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे.



## 'सिक्सर क्वीन'ला सरकारी नोकरी

**कोलकाता :** विश्वविजेत्या भारतीय महिला संघातील खेळाडूंवर कौतुकासह बक्षीसांचा वर्षाव सुरु आहे. यष्टीमागे बॅटरला अरेस्ट करणारी रिचा घोष ही आता डिएसपीच्या वर्दीत रुबाब झाडताना दिसणार आहे. सरकारने रिचाला राज्य पोलीस खात्यात पोलीस उपअधीक्षक पदावर नियुक्त केले आहे. या सन्मानामुळे ती भारताचा जलगदती गोलंदाज मोहम्मद सिराज आणि दीप्ती शर्मा यांच्या पक्तींत ती सामील झाली आहे. बंगाल क्रिकेट असोसिएशनच्या वतीने ईडन गार्डन्सच्या मैदानात रिचाच्या सन्मानार्थ खास कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रिचाला पोलीस अधीक्षक पदावर नियुक्त केल्याचे नियुक्ती पत्र प्रदान केले. यावेळी रिचाला राज्य सरकारकडून प्रतिष्ठित बंगभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय बंगाल क्रिकेट असोसिएशनकडून तिला गोल्डन बॅट आणि बॉलसह ३४ लाख रुपये रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले.महिला वनडे वर्ल्ड कप स्पर्धेत रिचा घोष हिने ८ सामन्यातील ८ डावात पॉवर हिटिंग शो दाखवून देताना १२ षटकार मारल्याचे पाहायला मिळाले. वर्ल्ड कप स्पर्धेतील यंदाच्या हंगामात सर्वाधिक षटकार मारणाऱ्या बॅटरच्या यादीत ती टॉपला राहिली.

## अनिश भानवालाला नेमबाजी स्पर्धेत रौप्य



**कैरो :** भारतीय नेमबाज अनिश भानवालाने जागतिक नेमबाजी स्पर्धेत रौप्य पदक जिंकले आहे. रविवारी झालेल्या हाय-व्होल्टेज २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल फायनलमध्ये अनिशने २८ गुणांसह दुसरे स्थान पटकावले. फ्रेंच नेमबाज क्लेमेंट बेसेजने सुवर्णपदक जिंकले, तर युक्रेनच्या मॅक्सिम होरोडिनेट्सने अनुक्रमे ३१ आणि २५ गुणांसह कांस्यपदक जिंकले. इजिप्तमधील कैरो येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताने एक सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्यपदकांसह एकूण पाच पदके जिंकून चौथ्या स्थानावर आहे. चीनने चार सुवर्णपदकांसह आठ पदकांसह आघाडी घेतली आहे.पहिल्यांदाच वर्ल्ड चॅम्पियनशिप फायनल खेळला, पॅरिस ऑलिंपिकमध्ये खराब कामगिरी केली.अनिशने रौप्य पदक जिंकले, जे त्याच्या कारकिर्दीतील सर्वात मोठे पदक होते. पॅरिस ऑलिंपिकमध्ये त्याने चांगली कामगिरी केली नव्हती आणि १३ वे स्थान मिळवले होते.२०१२ मध्ये लंडन ऑलिंपिकमध्ये २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल स्पर्धेत विजय कुमारने जिंकलेल्या रौप्य पदकानंतर अनिशचे हे पदक भारताचे दुसरे सर्वात मोठे पदक आहे. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या पहिल्या दिवशी भारतीय संघाने एका सुवर्णपदकासह चार पदके जिंकली. भारतीय लष्कराच्या हवालदार रविंदर सिंगने ५० मीटर फ्री पिस्तूलस्पर्धेत पहिले स्थान पटकावले. दक्षिण कोरियाच्या किमचेओंगयोंग ने रौप्य आणि वैयक्तिक खेळाडू अँटोन अरिस्टारखोव्हने कांस्यपदक जिंकले.

## विदित बुद्धिबळ विश्वचषकातून बाहेर

**पणजी :** रविवारी टाय-ब्रेक गेमच्या दुसऱ्या सेटमध्ये अमेरिकेच्या सॅम शँकलँडकडून पराभव पत्करावा लागल्याने भारतीय ग्रँडमास्टर विदित गुजराती बुद्धिबळ विश्वचषकाच्या तिसऱ्या फेरीतून बाहेर पडला.आणखी एक भारतीय खेळाडू एसएल नारायणनलाही टाय-ब्रेक गेमच्या पहिल्या सेटमध्ये चीनच्या यांगी यूकडून पराभव पत्करावा लागला.व्ही. कार्तिकने रोमानियाच्या डीक बोगदान-डॅनियलला पराभूत करून आपली धावपळ सुरू ठेवली. तो चौथ्या फेरीत पोहोचला. कार्तिक आता प्री-क्वार्टरफायनलमध्ये पोहोचण्यापासून फक्त एका विजयापासून दूर आहे. विदित गुजराती हा स्पर्धेच्या पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये बाहेर पडलेला तिसरा प्रमुख भारतीय खेळाडू आहे. त्याने विश्वविजेते डी. गुकेश आणि अरविंद चिथंबरम यांच्यानंतर स्थान मिळवले. गुकेशला जर्मनीच्या फ्रेडरिक स्वानने पराभूत केले, तर चिथंबरमला दुसऱ्या फेरीत कार्तिकने पराभूत केले.अर्जुन, प्रज्ञानंधा, हरिकृष्ण आणि प्रणव यांनी आधीच चौथी फेरी गाठली आहे. या स्पर्धेतील अव्वल तीन खेळाडूंना पुढील वर्षी होणाऱ्या उमेदवार स्पर्धेत प्रवेश मिळेल.

# टी-२० विश्वचषक २०२६
# २० संघ पात्र






**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धा सुरू होण्याची संभाव्य तारीख समोर आली आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली होणारा टी-२० विश्वचषक ७ फेब्रुवारीला होण्याची शक्यता आहे. या स्पर्धेसाठी जगभरातील २० संघ पात्र ठरले आहेत. तर एक संघ पहिल्यांदाच टी-२० विश्वचषक स्पर्धा खेळणार आहे, भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली ही स्पर्धा खेळवली जाणार आहे. सध्या सर्वच संघ टी-२० विश्वचषक २०३६ साठी जोरदार सराव करत आहेत. आता या स्पर्धेची तारीख समोर आली आहे. टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेला ७ फेब्रुवारीपासून सुरू होणार असल्याच म्हटलं आहे. तर स्पर्धेचा अंतिम सामना ८ मार्चला होण्याची शक्यता आहे. आयसीसीने अद्याप याबाबत माहिती दिलेली नाही. आधी दिलेल्या माहितीनुसार, या स्पर्धेसाठी भारतातील दिल्ली, चेन्नई, मुंबई, कोलकाता आणि अहमदाबाद ही पाच शहरे निवडली गेली आहेत. भारताशिवाय टी-२० विश्वचषक २०२६ चे सामने सह-यजमान श्रीलंकेच्या कोलंबो, पल्लेकेले आणि दाम्बुला किंवा हंबनटोटा यापैकी एका शहरात खेळवले जातील.**

टी-२० विश्वचषक २०२५ स्पर्धा आयपीएल २०२६ च्या आधी भारत आणि श्रीलंकेत खेळवली जाणार आहे. भारतात पाच ठिकाणी हे सामने खेळवले जातील. तर श्रीलंकेत कोणत्या तरी एकाच ठिकाणी सामने होणार असून अद्याप ठिकाण निश्चित झालेलं नाही. आयसीसी लवकरच स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर करणार आहे.२०२६ च्या टी-२० विश्वचषकात एकूण २० संघ सहभागी होतील. भारत आणि श्रीलंका हे संघ यजमान म्हणून स्पर्धेसाठी थेट पात्र ठरले आहेत. २०२४ च्या टी-२० विश्वचषकातील अव्वल सात संघांनाही थेट पात्रता मिळाली आहे, ज्यात अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आणि वेस्ट इंडिज यांचा समावेश आहे. याशिवाय, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि आयर्लंड यांनी त्यांच्या टी-२० क्रमवारीच्या आधारे पात्रता मिळाली.

कॅनडा अमेरिका पात्रता फेरीतून पात्र ठरला, तर इटली नेदरलँड्स, नामिबिया आणि झिम्बाब्वे यांनी आपापल्या प्रदेशातून वर्ल्डकप खेळण्याची पात्रता मिळवली. आशिया ईएपी पात्रता फेरीतील अखेरच्या सामन्यात संयुक्त अरब अमिराती टी २० विश्वचषकासाठी पात्र ठरणारा २० वा आणि शेवटचा संघ ठरला. ओमानमध्ये झालेल्या आशिया-पूर्व आशिया-पॅसिफिक पात्रता स्पर्धेत अव्वल तीनमध्ये स्थान मिळवून युएईने विश्वचषकासाठी पात्रता मिळवली. यापूर्वी नेपाळ व ओमान हे संघ स्पर्धेसाठी पात्र ठरले.

इटलीचा संघ टी-२० विश्वचषक स्पर्धा पहिल्यांदाच खेळणार आहे. स्पर्धेचे स्वरूप २०२४ च्या टी-२० विश्वचषकाप्रमाणेच असेल. २० संघांना चार गटांमध्ये विभागले जाईल, प्रत्येक गटात पाच संघ असतील. प्रत्येक संघ त्यांच्या गटातील इतर चार संघांशी एकदा खेळेल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ सुपर ८ फेरीत प्रवेश करतील. जिथून चार सर्वोत्तम संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील आणि त्यानंतर दोन अव्वल संघ जेतेपदासाठी लढतील.टी-२० विश्वचषकासाठी पात्र ठरलेल्या २० संघांमध्ये भारत, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश, इंग्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, झिम्बाब्वे, अफगाणिस्तान, नेपाळ, ओमान, युएई, इटली, नेदरलँड्स, नामिबिया, अमेरिका, कॅनडा आणि आयर्लंड यांचा समावेश आहे. भारत आणि पाकिस्तान सेमीफायनलमध्ये आमनेसामने आले तर पहिला सेमीफायनल सामना कोलंबोमध्ये होईल, तर दुसरी सेमीफायनल मुंबईत होईल. जर पाकिस्तान सेमीफायनलमध्ये पोहोचला नाही तर भारताचा उपांत्य फेरीतील सामना मुंबईत खेळवला जाईल.भारत आणि पाकिस्तान अंतिम फेरीत आमनेसामने आले तर सामना श्रीलंकेत तटस्थ ठिकाणी खेळवला जाईल. अन्यथा स्पर्धेतील अंतिम सामना हा अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवला जाईल. याशिवाय जर श्रीलंका उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला तर श्रीलंकेचा संघ कोलंबोमध्ये खेळेल. गट टप्प्यातील भारत पाकिस्तानचे सामने श्रीलंकेत खेळवले जातील. भारतीय संघ मुंबई, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नई येथे त्यांचे लीग सामने खेळण्याची शक्यता आहे.

### पहिल्या टेस्टमध्ये जागा फिक्स!
## ध्रुवला मिळणार संधी?

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



इंडिया ए टीमला पाहुण्या दक्षिण आफ्रिका ए कडून दुसऱ्या अनऑफीशियल टेस्ट मॅचमध्ये ४१७ धावा करुनही पराभूत व्हावं लागलं. मात्र टीम इंडियाचा युवा फलंदाज ध्रुव जुरेल याने आपली छाप सोडली. ध्रुवने दुसऱ्या सामन्यातील दोन्ही डावांत शतक झळकावलं. तसेच ध्रुवने यासह दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टेस्टसाठी दावा ठोकला आहे.

उभयसंघातील पहिला सामना हा १४ नोव्हेंबरला होणार आहे.ध्रुव विकेटकीपर बॅट्समन आहे. तर इंग्लंड दौऱ्यातील दुखापतीनंतर उपकर्णधार आणि विकेटकीपर असलेल्या ऋषभ पंत याचं दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टेस्ट सीरिजमधून भारतीय संघात कमबॅक झालं आहे. पंत पहिल्या सामन्यात खेळणार असल्याचं निश्चित आहे. त्यामुळे जुरेलला संधी मिळणं शक्य नसल्याचं म्हटलं जात आहे. मात्र ध्रुवला नितीश कुमार रेड्डी याच्या जागी संधी दिली जाऊ शकते.पंतला झालेल्या दुखापतीनंतर ध्रुवला कसोटी पदार्पणाची संधी मिळाली. तसेच ध्रुवला नुकतीच खेळण्याची संधी मिळाली. ध्रुव इंग्लंडनंतर मायदेशात विंडीज विरुद्ध टेस्ट सीरिजमध्ये खेळला होता.

## उझबेकिस्तानचा बेलोसोव्ह, ब्रिटनची गॅरेट अव्वल

**। पणजी । वृत्तसंस्था ।**

उझबेकिस्तानचा कॉन्स्टंटिन बेलोसोव्ह व ब्रिटनची एली गॅरेट यांनी आयर्नमॅन ७०.३ स्पर्धेत अनुक्रमे पुरुष व महिला गटात अव्वल क्रमांक प्राप्त केला. सांघिक गटात भारतीय वायुदलाने दबदबा राखला. या कठीण स्पर्धेत १.९ किलोमीटर सागरी जलतरण, ९० किलोमीटर सायकलिंग आणि २१.१ किलोमीटर धावण्याचा समावेश होता. कॉन्स्टंटिन बेलोसोव्हने चार तास २५.४७ मिनिटांत विजेतेपद पटकावले. महिला गटात ब्रिटनच्या एली गॅरेट हिने ५ तास १८.४३ मिनिटे वेळ दिली. सांघिक गटात भारतीय वायुदलाचे तिन्ही संघ प्रभावी ठरले.

## शिक्षक क्रीडा स्पर्धेत म्हसळा केंद्राचे वर्चस्व

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**



राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० व राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांच्यातील समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने राज्यभर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याच अनुषंगाने तालुका स्तरावरील शिक्षक क्रीडा स्पर्धेचे आयोजन न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे उत्साहात पार पडले. स्पर्धेच्या माध्यमातून शिक्षकांचे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच संघभावना आणि खेळाडूवृत्ती विकसित करण्यावर भर देण्यात आला. या क्रीडा स्पर्धेत व्हॉलीबॉल, खो-खो यांसारख्या सांघिक स्पर्धा तसेच गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक आणि १०० मीटर धावणे या वैयक्तिक स्पर्धांचा समावेश होता.

खो-खो स्पर्धेत प्रथम क्रमांक केंद्र संदेरी तर द्वितीय क्रमांक केंद्र पाष्टी यांनी मिळवला. व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक केंद्र म्हसळा तर द्वितीय क्रमांक केंद्र पाष्टी यांनी पटकावला.

वैयक्तिक स्पर्धांमध्ये गोळाफेक प्रथम बंडू बोराडे शाळा पाष्टी, द्वितीय पावले, तृतीय नागरे, थाळीफेक प्रथम अमोल जानके शाळा गडदाव कोंड, द्वितीय नरेश सावंत शाळा मांदाटणे, तृतीय शंकर फोंडस, १०० मीटर धावणे प्रथम कृष्णा पांडुळे शाळा मांदाटणे, द्वितीय सावन घोडमारे, तृतीय शेख हाकीम, भालाफेक प्रथम फोंडसे शाळा पांगळोली मराठी यांनी प्रथम क्रमांक मिळवला. या स्पर्धांना शिक्षकवर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. विजेत्या खेळाडूंना पारितोषिक वितरण समारंभात गौरविण्यात आले.

### रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित
## एकोणीस वर्षाखालील मुलांच्या स्पर्धेला शुभारंभ



**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित एकोणीस वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला काल रायगड जिल्ह्यातील विविध भागातील क्रिकेट मैदानावर सुरुवात करण्यात आली.

घरत क्रिकेट मैदान खारघर येथे रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांच्या शुभहस्ते स्पर्धेला शुभारंभ करण्यात आला. एसबीसी महाड विरुद्ध चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर ह्या दोन संघाने मध्ये उद्घाटनीय सामना खेळविण्यात आला.तसेच रायगड जिल्ह्यातील बी.पी पाटील क्रिकेट मैदान खारघर,घरत क्रिकेट मैदान,फोर्टी प्लस गावदेवी क्रिकेट मैदान टेंभोटे पनवेल,छत्रपती शिवाजी महाराज मैदान उलवे, छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट क्रीडांगण पेण अशा जिल्ह्यातील विविध मैदानावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नामवंत क्रिकेट अकॅडमी/क्लब संघानी यामध्ये सहभाग घेतला आहे. स्पर्धा प्रथम साखळी व नंतर बाद फेरीनुसार होणार असून स्पर्धेतील खेळाडूंनी केलेल्या कामगिरीवर रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा संघ निवडला जाणार आहे.निवड झालेला संघ पुढे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या आंतरजिल्हा निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## चेन्नईचा 'संजू'वर डाव

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२६साठी डिसेंबरमध्ये मिनी लिलाव पार पडणार आहे. त्याआधी या स्पर्धेत सहभागी १० संघ रिटेन रिलीजच्या खेळाशिवाय ट्रेड विंडोच्या माध्यमातून खेळाडूंची अदलाबदलीचा डाव खेळतील. संजू सॅमसन ट्रेड विंडोच्या माध्यमातून ताफ्यात सामील होईल, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून रंगत आहेत. राजस्थान रॉयल्सचा संघ संजू सॅमसनला चेन्नई सुपर किंग्जकडे सोपवण्यास तयार आहे. पण त्याच्या बदल्यात राजस्थान रॉयल्सच्या संघाने रवींद्र जडेजा आणि सॅम कुरेन या दोन अष्टपैलू खेळाडूंना आपल्या ताफ्यात मागणी केली आहे.

### अनायाची नवी इनिंग;
## क्रिकेटच्या मैदानावर कमबॅक

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



भारतीय महिला क्रिकेट संघाच्या विश्वचषक विजयाने महिला क्रिकेटपटूंचे मनोबल वाढले आहे. यामुळे भारतीय संघासाठी खेळण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मुलींनाही ऊर्जा मिळाली आहे. त्यापैकी माजी भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक संजय बांगर यांची मुलगी अनाया बांगर आहे. अनाया बांगरने आता एक व्हिडिओ शेअर केला आहे जो व्हायरल होत आहे.

या व्हिडिओमध्ये अनाया क्रिकेटच्या मैदानावर परतताना दिसत आहे. पण आता अनायाबद्दल एक वेगळीच चर्चा होताना दिसत आहे.

या व्हिडिओमध्ये अनाया इंडियन प्रीमियर लीग विजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूची अधिकृत किट बॅग घेऊन जाताना दिसत आहे. यावरून असे सूचित होते की अनाया आगामी महिला प्रीमियर लीग म्हणजे डबल्यूपीएल २०२५मध्ये आरसीबी महिला संघाकडून खेळताना दिसू शकते. अनायाने गेल्या वर्षी लंडनमध्ये लिंग बदल शस्त्रक्रिया केली होती. याआधी ती एक क्रिकेटपटू होती आणि मुंबईच्या अंडर-१६ संघासाठी राष्ट्रीय स्तरावरही खेळली होती.

**राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा | अंतिम सामन्यात खेळाडूंचा लागणार कस**

# पुणे ग्रामीण-अहिल्यानगरमध्ये जेतेपदाची लढत रंगणार

**। पुणे । प्रतिनिधी ।**



पुणे ग्रामीण, अहिल्यानगर या संघांनी किशोरी गटाची अंतिम फेरी गाठली. गतविजेता परभणी संघाने किशोर गटात अंतिम फेरीत प्रवेश केला. किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा पुणे येथे सुरू आहे. अहिल्यानगर संघ प्रथमच किशोरी गटात अंतिम फेरीत दाखल झाला आहे.

पिंपरी चिंचवडच्या बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत सुरू असलेल्या या स्पर्धेच्या किशोरी गटातील उपांत्य फेरीत झालेल्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने नंदुरबारला ४६-२९ असे पराभूत करून अंतिम फेरी गाठली. नंदुरबारने सुरुवात पहिले चार गुण घेत झोकात सुरुवात केली, पण नंतर मात्र ते ढेपाळले. पुणे ग्रामीण संघाने दोन लोन देत पूर्वार्धात २५-१४ अशी आघाडी घेऊन वर्चस्व प्रस्थापित केले. उत्तरार्धात तोच धडाका कायम राखत विजय मिळविला. मानसी गावडे, भारती राऊत यांनी पुणे ग्रामीण संघाकडून तर वैष्णवी देवकाते, मोनिका देवकाते यांनी नंदुरबार संघाकडून चमक दाखवली.

उपांत्य फेरीचा सामना अत्यंत चुरशीने खेळला गेला, मात्र त्यात अहिल्यानगरने पहिल्या डावातील पिछाडीवरून ३५-२९ असा जिंकला. नाशिक ग्रामीण संघाचा या वेळी पराभव झाला. दोन्ही संघांनी या सामन्यात एक-एक लोनची नोंद केली, पण ११ बोनस गुण घेऊन अहिल्यानगरने या सामन्यात बाजी मारली. ज्ञानेश्वरी ढवण, फौजिया शेख यांच्या सर्वांग सुंदर चढाया त्यांना श्रेया आडसुळ, विरा ठोंबरे यांची पकडीची मिळालेली साथ त्यामुळे अहिल्यानगरने शेवटच्या क्षणी बाजी पलटवली.

### पिछाडीवरून बाजी

पहिल्या उपांत्य फेरीच्या रंगतदार सामन्यात गतविजेत्या परभणी संघाने अहिल्यानगर संघावर मात करीत अंतिम फेरी गाठली. विश्रांतीला परभणी संघ सात गुणांनी पिछाडीवर होता. विश्रांतीनंतर आपला खेळ गतिमान करत परभणीने शेवटच्या क्षणी विजय साकारला. राहुल चव्हाण व विजय तारे यांच्या झंझावाती चढाया त्यांना मिळालेली सुनीलकुमार, दीपराज कांबळे यांची साथ त्यामुळे हा विजय साकारला. समर्थ हेळूदे, साईराज तागडे, शिवम शेंडगे यांनी शेवटच्या क्षणापर्यंत शर्तीची लढत दिली, पण पहिल्यांदाच ते अंतिम फेरीपासून वंचित राहिले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)